Marathi ▸▸ Solapur ▸▸ Volum 7 ▸▸ Issue 85 ▸▸ Friday, 8 May 2026 ▸▸ Page 8 ▸▸ Price 5 Rupee
मराठी ▸▸ सोलापूर ▸▸ वर्ष ७ वे ▸▸ अंक ८५ वा ▸▸ शुक्रवार दि. ८ मे २०२६ ▸▸ पाने ८ ▸▸ किंमत ५ रूपये

हिंदवी बाण्याचे मराठी दैनिक

www.shivnirnay.in daily.shivnirnay.in

# शिव निर्णय

DAILY SHIV NIRNAY

RNI No.-MAHMAR/2020/79125

रायगड, पुणे, सातारा, सोलापूर सह संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक


### कोल्यातील १० वर्षीय चिमुकलीवरील अत्याचारप्रकरणी मोठी कारवाई; ६० वर्षाचा नराधम जेरबंद


अकोला : जिल्ह्यातील पातुर तालुक्यात १० वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचारप्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी ६० वर्षीय जगराम आडे याला अखेर अकोला पोलिसांनी अटक केली आहे. घटनेनंतर आरोपी दोन दिवसांपासून फरार होता. स्थानिक गुन्हे शाखा आणि वन विभागाच्या संयुक्त कारवाईत जंगल परिसरातून त्याला ताब्यात घेण्यात आलं. पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी मोठं सर्च ऑपरेशन राबवलं होतं. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके आणि त्यांच्या पथकाने दोन दिवस सातत्याने शोधमोहीम सुरू ठेवली होती. अखेर आलेगावच्या जंगल परिसरातून आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आलं.

# तामिळनाडूचे राज्यपाल भाजपचे एजंट

## ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांचा आरोप, विजयचा मुख्यमंत्री शपथविधी लांबणीवर

मुंबई: देशातील ५ राज्यात झालेल्या निवडणुकांत भाजपला मोठं यश मिळालं असून ५ पैकी ३ राज्याच भाजपने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता स्थापनेचं यश मिळवलं आहे. विशेष म्हणजे, पश्चिम बंगालमध्ये भाजपला २०० हून अधिक जागा जिंकता आल्याने या विजयाची देशभर चर्चा आहे. मात्र, दुसरीकडे तामिळनाडूत सुपरस्टार अभिनेता थपलती विजयच्या टीव्हीके पक्षाने पदार्पणातच १०८ जागा जिंकत ऐतिहासिक विजय मिळवला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील विजय आणि टीव्हीकेचं अभिनंदन केलं. त्यानंतर, ७ मे रोजी अभिनेता विजय थलपती मुख्यमंत्रीपदाची





शपथही घेणार होता. मात्र, तेथील राज्यपालांनी काही तांत्रिक अडचणी सांगत सत्तास्थापनेचं निमंत्रणच न दिल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यातच, आता ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ आणि माजी मंत्री कपिल सिब्बल यांनी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर हे भाजपचे एजंट असल्याचा आरोप केलाय.

तामिळनाडूतील विधानसभा निवडणुकीत विजय थलपतीच्या टीव्हीके पक्षाने १०८ जागा जिंकल्या आहेत. मात्र, बहुमताचा आकडा गाठण्यासाठी त्यांना आणखी १० आमदारांची गरज आहे. त्यामुळे, नेमकं कुणाच्या पाठिंब्यावर तिथं टीव्हीकेचं सरकार स्थापन होणार याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

तमिळगा वेत्री कळघमचे प्रमुख विजय यांनी गुरुवारी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेत सत्ता स्थापनेचा दावा सादर केला. आवश्यक संख्याबळ आपल्या बाजूने असल्याचा दावा विजयने केला असून शपथविधीनंतर विधानसभा सभागृहात सहज बहुमत सिद्ध करू, असा विश्वासही त्यांनी राज्यपालांना दिला. मात्र, भाजपने अचानक या सत्तासमीकरणात एंट्री घेतल्याने तमिळनाडूच्या राजकारणात नवे वळण मिळाले आहे. एआयएडीएमकेने थलपती विजय यांच्या टीव्हीकेसोबत युती करावी, यासाठी भाजप प्रयत्न करत असल्याचे समोर आले आहे.

केरळमध्ये काँग्रेसने दमदार पुनरागमन केल्यानंतर तमिळनाडूतही काँग्रेसला सत्तेत स्थान मिळू नये, अशी भाजपची रणनीती असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे भाजप एआयएडीएमके आणि टीव्हीके यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन करावे, अशी भूमिका घेत आहे. दुसरीकडे तामिळनाडूच्या राज्यपालांनी अद्यापही विजय यांना सत्तास्थापनेचं निमंत्रण न दिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून राज्यपालांच्या भूमिकेवर शंका उपस्थित होत आहे.

# ममता बॅनर्जी सरकार बरखास्त

## राज्यपालांचा मोठा निर्णय, बंगालमध्ये भाजप सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा

कोलकाता: : पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी घडामोड घडली आहे. मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिल्यानंतर राज्यपालांनी ममता बॅनर्जी यांच्या मंत्रिमंडळाला बरखास्त केलं आहे. विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा मोठा पराभव झाल्यानंतरही ममता बॅनर्जी यांनी सत्ता सोडण्यास नकार दिला होता. त्यानंतर राज्यपालांनी संवैधानिक अधिकारांचा वापर करत हा मोठा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.

तृणमूल काँग्रेस प्रमुख ममता बॅनर्जी यांनी निवडणुकीचा निकाल हा जनादेश नसून कटकारस्थान असल्याचा आरोप केला होता. ''आमचा पराभव जनतेमुळे नाही, तर निवडणूक प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकारांमुळे झाला आहे,'' असा दावा त्यांनी केला होता.

ममता बॅनर्जी यांनी भाजप-पेक्षा निवडणूक आयोगाविरोधातच आमची लढाई होती, असा गंभीर आरोप केला होता. ''जवळपास १०० जागांवर जनादेश लुटण्यात आला. मतमोजणी जाणीवपूर्वक संथ करण्यात आली. आम्हाला हरवण्यासाठी संपूर्ण यंत्रणा वापरण्यात आली,'' असा आरोप त्यांनी केला.

आपण हरलेलो नाही, त्यामुळे लोकभवनात जाऊन राजीनामा देण्याचा प्रश्नच नाही असं म्हणत मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नसल्याचं ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या पहिल्या सरकारच्या शपथविधीची तयारी सुरू झाली आहे. ९ मे रोजी कोलकात्यातील ब्रिगेड परेड ग्राउंड येथे शपथविधी सोहळा पार पडणार असल्याची माहिती आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था तैनात केली जाणार आहे.

या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## महाराष्ट्र बोर्डाचा दहावीचा निकाल आज दुपारी १ वाजता जाहीर होणार, बोर्डाकडून मोठी घोषणा

पुणे/ मुंबई : राज्यातील महाराष्ट्र बोर्डाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या जाहीर केला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकाल आज जाहीर होणार आहे. शुक्रवार दिनांक ०८ मे २०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता निकाल ऑनलाईन पद्धतीनं जाहीर करण्यात येणार आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत निकाल जाहीर करण्यापूर्वी सकाळी अकरा वाजता पत्रकार परिषद देखील घेतली जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या म्हणजेच ८ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकाल उद्या जाहीर केला जाणार आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र अर्थात इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना ऑनलाईन पाहता येणार आहे. निकालाबाबतची अधिकृत वार्ताहर परिषद आज सकाळी ११ वाजता राज्य मंडळ कार्यालयात होणार आहे.

## शिंदेंच्या हेलिकॉप्टरचं इमर्जन्सी लँडिंग; डीसीएमच्या चॉपरला वादळाचा फटका, थोडक्यात अनर्थ टळला

मुंबई: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टर ला वादळाचा फटका बसला आहे. सोसाट्याचा वारा आणि धुळीच्या वादळामुळे एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरचं एमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. एकनाथ शिंदे मुंबईहून मुरबाडला जात होते. एका लग्न सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री मुरबाडला निघाले होते. पण त्यांच्या हेलिकॉप्टरला वादळाचा तडाखा बसला. पायलटनं प्रसंगावधान राखत हेलिकॉप्टर मुंबईच्या दिशेनं वळवलं. जुहूतील विमानतळावर हेलिकॉप्टर लँड करण्यात आलं.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्सवरुन हेलिकॉप्टरनं निघाले होते. मुरबाडमध्ये एका लग्न सोहळ्यासाठी शिंदे हेलिकॉप्टरनं मुरबाडला निघाले. पण कल्याण परिसरातील धुळीच्या वादळाचा फटका शिंदेंच्या हेलिकॉप्टरला बसला. या कठीण प्रसंगात पायलटनं समयसूचकता दाखवली. हेलिकॉप्टर जवळपास १० ते १५ मिनिटं धुळीच्या वादळात अडकलं होतं. पायलटनं प्रसंगावधान दाखवत हेलिकॉप्टर पुन्हा मुंबईच्या दिशेनं वळवलं. जुहूतील विमानतळावर हेलिकॉप्टर सुरक्षित लँड झाले. शिंदे आणि त्यांच्या सोबत हेलिकॉप्टरमध्ये असलेले सगळे सुरक्षित आहेत. पायलटच्या प्रसंगावधानानं मोठा अनर्थ टळला आहे.

## बिहार सरकारचा २२ दिवसांनी विस्तार, नितीशकुमारांच्या लेकाला सुद्धा मंत्रीपद

पटणा : सम्राट चौधरी मुख्यमंत्री झाल्यानंतर २२ दिवसांनी मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. या भव्य सोहळ्यात नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार आणि इतर ३२ मंत्री मंत्रिमंडळात सामील झाले. नवीन मंत्रिमंडळात भाजपचे १५, जेडीयूचे १३, एलजेपी(आर)चे दोन, तर एचएएम आणि आरएलएमचे प्रत्येकी एक मंत्री आहेत. या सोहळ्यात पाच आमदारांनी एकाच वेळी शपथ घेतली. निशांत कुमार, श्रवण कुमार, विजय सिन्हा, लेसी सिंग आणि दिलीप जयस्वाल यांनी शपथ घेतली. निशांत कुमार यांचे हे पहिलेच मंत्रीपद आहे.

पंतप्रधान मोदीही या सोहळ्याला उपस्थित होते. सोहळ्यानंतर पंतप्रधानांनी नितीश कुमार यांना मंचावर बोलावून त्यांच्याशी हस्तांदोलन केले, त्यावेळी नितीश कुमार यांनी पंतप्रधानांच्या खांद्याला हात ठेवला. बिहारचे दोनदा आरोग्य मंत्री राहिलेल्या मंगल पांडे यांना यावेळी मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही; त्यांना पक्षात एक महत्त्वाचे पद दिले जाईल असे वृत्त आहे.

## हावडामध्ये बॉम्ब फोडला, भाजपचे दोन कार्यकर्ते जखमी

कलकत्ता : पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राजकीय वातावरण अधिकच तापलं आहे. भाजप नेते शुभेंदू अधिकारी यांच्या खासगी सहायकाच्या हत्येनंतर आता हावड्यात बॉम्बहल्ल्याची घटना समोर आली आहे. टीएमसी समर्थकांकडून देशी बॉम्ब फेकण्यात आल्याचा आरोप भाजपने केला असून या हल्ल्यात भाजपचे दोन कार्यकर्ते जखमी झाले आहेत. जखमी कार्यकर्त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर परिसरात मोठा तणाव निर्माण झाला आहे.

गुरुवारी हावड्यातील शिबपूर भागातील चौराबस्ती परिसरात भाजप आणि तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार संघर्ष झाल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर कथितरित्या बॉम्बफेक करण्यात आल्याची माहिती आहे. घटनेनंतर मोठ्या प्रमाणात पोलीस आणि केंद्रीय सुरक्षा दल घटनास्थळी दाखल झाले.

या हिंसक घटनेमुळे परिसरातील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणल्याचा दावा केला असून हल्ल्यामागील कारणांचा तपास सुरू आहे.

हावडा सिटी पोलीस आयुक्त अखिलेश चतुर्वेदी यांनी या घटनेला राजकीय संघर्ष असल्याचं म्हटलं आहे. ''शिबपूरच्या चौराबस्ती भागात राजकीय संघर्ष झाला असून त्यात एक व्यक्ती जखमी झाली आहे.

माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेत सहभागी असलेल्या सर्वांना लवकरच अटक केली जाईल,'' असं त्यांनी सांगितलं.

# ममता बॅनर्जी यांचा पराभव केल्यामुळे चंद्रनाथ रथ यांची हत्या

## शुभेंदू अधिकारी यांचे ममतांवर गंभीर आरोप

कलकत्ता : ममता बॅनर्जी यांचा पराभव केल्यामुळे वैयक्तिक सहाय्यक चंद्रनाथ रथ यांची हत्या करण्यात आल्याचा गंभीर आरोप भाजप नेते शुभेंदू अधिकारी यांनी केला आहे. शुभेंदू म्हणाले, ''ज्या पद्धतीने ही हत्या करण्यात आली आहे, त्याचा कितीही निषेध केला तरी तो कमीच पडेल. भवानीपूरमधील ममता बॅनर्जी यांचा पराभव हे या हत्येमागील कारण असू शकते.'' दरम्यान, चंद्रनाथ यांच्या आई म्हणाल्या, ''या पराभवाचा बदला म्हणून माझ्या मुलाची हत्या करण्यात आली. काही नेत्यांनी यापूर्वीच धमकी दिली होती की, ४ तारखेनंतर त्याला कोणीही वाचवू शकणार नाही.''

रथ यांना चार गोळ्या लागल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले. पोलिसांनी या प्रकरणी तीन जणांना ताब्यात घेतले आहे. हत्येसाठी वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. चंद्रनाथ यांच्या गाडीवर गोळ्यांचा वर्षाव करण्यात आला आणि हल्लेखोर तात्काळ पळून गेले. बुधवारी रात्री साडे दहा वाजता चंद्रनाथ यांची हत्या झाली. ते कोलकाताहून मध्यमग्राम येथील आपल्या घरी परतत होते. कोलकातापासून सुमारे २० किमी अंतरावर असलेल्या डोलतला येथे रथ यांच्या स्कॉर्पिओ गाडीसमोर एक कार येऊन थांबली. दरम्यान, बाईकवरून आलेल्या हल्लेखोरांनी सहा ते दहा गोळ्या





झाडल्या. दोन गोळ्या चंद्रनाथ यांच्या छातीत घुसल्या. एक गोळी त्यांच्या पोटात लागली. त्यांचे चालक, बुद्धदेव बेरा, यांनाही गोळी लागली. हत्येनंतर, हल्लेखोरांनी कार सोडून बाईकवरून पळ काढला. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे डॉक्टरांनी चंद्रनाथ यांना मृत घोषित केले. त्यांच्या चालकावर उपचार सुरू आहेत.

## मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत ६२ लाखांची फसवणूक

मुंबई: सायबर पोलिसांनी सायबर गुन्हेगारांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. त्यांनी सिंहगड रोडवर राहणाऱ्या एका ४९ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनिअरची, ऑनलाइन शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ६२ लाख रुपयांची फसवणूक केली.

ही फसवणूक गेल्या वर्षी एप्रिल आणि मे महिन्यादरम्यान झाली. तक्रारदाराने आपले पैसे परत मिळवण्यासाठी बराच काळ वाट पाहिली. त्यांनी गेल्या महिन्यात पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीची चौकशी केल्यानंतर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

# बारामतीत झळकले बॅनर, जय पवारही म्हणाले सुनेत्रावहिनी मुख्यमंत्री

## भाजपचे जयकुमार गोरे म्हणतात, २०२९ ला देवाभाऊच

बारामती : राष्ट्रवादीचे युवा नेते तथा अजित पवारांचे धाकटे चिरंजीव जय पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. काही दिवसांपूर्वी आमची सहकाऱ्यांसोबत चर्चा झाली, सर्वच बारामतीकरांची इच्छा होती की, दादांना एकदा मुख्यमंत्री पाहायचं आहे. आता, वहिनी देखील खूप कष्ट घेत आहेत, मला वाटतं २०२९ ला बारामतीतून विधानसभेला वहिनीच उभा राहतील आणि आमची सर्वांची आशा आहे की, सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री म्हणून ती जागा घ्यायला पाहिजे, असे वक्तव्य जय पवार यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर बारामतीत लागलेल्या एका फ्लेक्सची जोरदार चर्चा सुरु आहे. होय मुख्यमंत्रीच असा सुनेत्रा पवारांचा बारामतीत फ्लेक्स लागला आहे.

बारामतीत सुनेत्रा पवारांचा होय मुख्यमंत्रीच असा फ्लेक्स झळकला आहे. महाराष्ट्राचा पहिला महिला मुख्यमंत्री म्हणून उभा महाराष्ट्र तुमच्याकडे पाहतोय असा असं बॅनरवर छापण्यात आलं आहे. सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार होय मुख्यमंत्रीच.




महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून उभा महाराष्ट्र तुमच्याकडे पाहतोय अशा असायचा बॅनर सगळ्यांचे लक्ष वेधून घेतोय. आजच जय पवारांनी या संदर्भात वक्तव्य केलं आणि वेगवेगळ्या राजकीय चर्चा घडू लागल्या त्यातच हा फ्लेक्स सगळ्यांचं लक्ष वेधून घेत आहे.

मुख्यमंत्री व्हायला मोठा जनाधार लागतो असे म्हणत मंत्री जयकुमार गोरेंनी जय पवारांचे कान टोचले. प्रत्येक कार्यकर्त्यांची इच्छा असते आपला नेता मोठा व्हावा.पण मुख्यमंत्री होण्यासाठी आमदाराची संख्या आणि पाठिंबा लागतो. पण आजची स्थिती पाहता २०२९ मध्ये देवेंद्र फडणवीसच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असतीलदरम्यान ग्रामविकास मंत्री जय कुमार गोरेच खासदार प्रणिती शिंदेंना देखील खोचक टोला लगावला. खासदार प्रणिती शिंदेंनी राहुल गांधीच्या घरासमोरच्या रस्त्याची काळजी करावी. सोलापुरात मोहोळ ते वळसंग महामार्ग ७४० कोटी रुपयांच मंजूर झाला आहे. या रस्त्याच्या कामाचे श्रेय घेण्यासाठी भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजप आमदार सुभाष देशमुख आणि काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्यात श्रेयवाद सुरु आहे. यावर बोलताना भाजप नेते व ग्रामविकास मंत्री जय कुमार गोरेंनी खा. प्रणिती शिंदेंना टोला लगावला. तर नसरापूर घटनेवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा मागितल्यावरून ही प्रणिती शिंदेवर गोरेंनी टीका केली. दिल्लीत निर्भया कांड घडलं होत. त्यावेळी सुशिलकुमार शिंदेनी गृहमंत्री पदाचा राजीनामा दिला होता का? असा सवाल गोरेंनी केला. सुशील कुमार शिंदे हे देशाचे केंद्रीय गृहमंत्री होते. त्यांच्या कार्यकाळात अनेक बलात्कार सारख्या घटना घडल्या होत्या. दिल्लीत निर्भया सारखा मोठा कांड झालेलं होतं. त्यावेळी सुशिलकुमार शिंदेंनी गृहमंत्री पदाचा राजीनामा दिला होता का? असा सवाल गोरेंनी केला.

## कलिंगड खाल्ल्यानंतर चौघांच्या मृत्यूच रहस्य उलगडल; कलिना एफएसएलच्या प्रयत्नांना मोठ यश

मुंबई : गेल्या १० दिवसांपूर्वी आलेल्या एका वृत्ताने सगळ्यांची झोप उडवली होती. कारण, रात्री कलिंगड खाल्ल्यानंतर दुसऱ्या दिवशी एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मुंबईतील पायधुनी परिसरातून समोर आली होती. त्यामुळे, या घटनेचं गुढ वाढलं होतं. मुंबईतील पायधूनी परिसरात डोकाडिया कुटुंबातील चारही सदस्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याच्या घटनेचं खरं कारण शोधणं हे पोलीस आणि तपास यंत्रणेसमोर मोठं आव्हान होतं. याप्रकरणी आत्तापर्यंतची सर्वात मोठी माहिती समोर आली. उंदीर मारण्याच्या औषधाने चौघांचा मृत्यू झाल्याचं धक्कादायक वास्तव फॉरेन्सिक अहवालातून स्पष्ट झालं आहे. त्यामध्ये, मुंबईतील फॉरेन्सिक सायन्स लॅबोरटरीजचं



महत्त्वाचं योगदान राहिलं आहे.

पायधुनीत एकाच कुटुंबातील मृत झालेल्या चौघांच्याही शरीरात उंदीर मारण्याच्या औषधाचे झिंक फॉस्फाईटचे अंश सापडले आहेत. चौघांच्या शरीरात आणि घरातील कलिंगडाच्या नमुन्यांमध्ये देखील झिंक फॉस्फाईट सापडले आहे. कलिना एफएसएलमुळे तब्बल ११ दिवसांनी अखेर या प्रकरणाचा छडा लागला असून मृत्यूचं खरं कारण समोर आलं. मात्र, कलिंगडचं नाव समोर आल्यामुळे कलिंगड उत्पादक शेतकरी आणि मुंबईतील विक्रेत्यांवर याचा मोठा परिणाम झाला होता. पण, कलिना एफएसएलने हे सत्य शोधलं आहे. मुंबईच्या पायधुनीतील कलिंगडमुळे मृत्यू झाल्याचा संशय असलेल्या प्रकरणात कलिना एफएसएलचे संचालक डॉ. विजय ठाकरे यांच्या नेतृत्वात कालिना एफएसएलचे तज्ज्ञ अहोरात्र या प्रकरणाचा छडा लावण्यात गुंतले होते. या घटनेतील मृतांच्या शरीरातील बरेचसे विष हे उल्टीवाटे बाहेर पडल्याने शरीरातून विषाचे नमुने सापडणं कठीण होऊन बसलं होत. मात्र, सुक्ष्म निरीक्षक आणि छडा लावण्यासाठी घेतलेल्या मेहनतीने अखेर कलिना एफएसएलच्याय तज्ज्ञांच्या प्रयत्नांना यश आलं. घटनेतील मृत चारही जणांच्या शरीरात तसेच कलिंगडावर झिंक फॉस्फेट हे विषारी औषध सापडलं. जे उंदीर मारण्यासाठी वापरलं जातं, त्याचे नमुने सापडल्यानेच चौघांचाही मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. तर, तब्बल ११ दिवसानंतर उंदीर मारण्याच्या औषधानेच एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं आहे.

# संपादकीय

## उष्णतेची लाट, आग ओळखणारा सूर्य

उन्हाळ्याच्या दिवसात नेहमी चढे असणारे तापमान यावर्षी अधिक दाबदायक बनवत आहे या कोकणपट्टीत साधारणपणे दमट हवामानाचा अनुभव येतो तेथे या वेळेला उष्माघाताचे प्रकार आढळून येत आहेत. महाराष्ट्राच्या उर्वरित भागातही उष्णतेची लाट तीव्र होताना दिसते आहे. हा सारा प्रकार ग्लोबल वार्मिंगच्या अनुभव आहे पावसाळ्याच्या पूर्वी अशी तीव्रता जाणवू लागले की चांगला पाऊस होणार. शेतकऱ्यांपासून सामान्य लोकांपर्यंत सर्वांना लागून राहते तशी चिन्हे दिसत आहेत. लहान मुले वयोवृद्ध माणसे महिला अपंग अशक्त लोक यांच्यासाठी हा उन्हाळा अत्यंत कठीण ठरत आहे दुपारच्या वेळेची तीव्रता अधिक जाणवते. तापमापक यंत्रावरील पारा ४३ ते ४४ च्या पुढेच गेलेला दिसतो. सोलापूर धाराशिव शहरातही ४४-४५ च्या जवळपास तापमान आढळून आले आहे. तर रायगड सातारा पुणे येथे ही साधारण तापमान ४० च्या दरम्यान आहे. यावर्षी अवेळी पडणारा पाऊस झाला. ग्रामीण भाषेत अवकाळी पाऊस म्हणतात किंवा वाळव्याचा पाऊस म्हणतात म्हणजे एप्रिल महिन्याचे येवून गेला आहे पावसाचा स्वीकार झाला की थोडेसे तापमान कमतरता येते पण तो शिडका आधीच होऊन गेलेला असल्यामुळे आता मे महिन्यापर्यंत म्हणजे पावसाळा सुरू होण्यापर्यंत पाऊस येण्याची शक्यता वर्तवली जात नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत तापमानाचे कमी होण्याची शक्यता नाही अशा परिस्थितीत त्याला समोर जाणे एवढाच आपल्या समोरचा मार्ग राहतो तो किती सावध पद्धतीने खबरदारी घेऊन वाढला जातो याच्यावर आपले जगणे अवलंबून आहेत. त्यामुळे उन्हात काम न करणे भरपूर पाणी पिणे नाक, डोके यांना झाकून ठेवणे सावलीचा आसरा घेणे भरपूर पाणी पातळ पदार्थ खाणे लक्षणे दिसतात डॉक्टरशी संपर्क करणे अशा गोष्टी आपण सरकारने सांगितलं म्हणून टाळत असतो तसे करू नका आपल्याला असे काही जाणवत असेल तर लगेच डॉक्टरांशी संपर्क करा. उन्हाळ्याच्या भर उन्हात काम केले की घाम येतो त्यातून पाण्याचे शरीरातील पाणी कमी होते आणि पाणी कमी पिले कि पाणीतील झीज भरून येत नाही म्हणून पाणी भरपूर पिले पाहिजे. लहान मुले माणसे यांच्यासाठी विशेष खबरदारी घ्यावी पाण्याची टंचाई आधीच निर्माण झालेले आहे की अधिकृत होणार आहे पावसाच्या अगोदर तिची तीव्रता अधिक असणार आहेत आधीच पाण्याचे स्त्रोत्र आटत आहेत त्यात तळपणाला सूर्य तळपत प्रमाण वाढत आहे. असे आवाहन आम्ही करतो ज्यांना कुणाला उष्पाघाताची लक्षण दिसत असेल तोंडाला कोरड पडत असेल तर लगेच दवाखान्यात जाऊन दाखवायला हवे डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा एक करणे शक्य आहे की आपण फार काळ सतत उन्हात न राहता सावलीत थोडा वेळ उन्हात थोडा वेळ असे करत गेलो तर त्याची तीव्रता कमी होते असे करणे शक्य असते डोक्याला रुमाल पटका वापरणे शक्य असते छत्री घेऊन वावरणे शक्य असते या प्रतिबंधात्मक उपाययोजना करायला हव्यात सोबत पाण्याची बाटली असायला हवी अशा साध्या उपायोजनांनी आपण उष्माघाताचा धोका टाळू शकतो आपण आग ओळखणारा सूर्य रोखू शकत नाही मात्र त्यापासून स्वतःचे संरक्षण करून घेऊ शकतो असा विचार सर्वांनी करावा असे आम्ही आवाहन करतो.

## पाककृती

### मालवणी कोंबडी



काही परप्रांतीय लोक मालवणी पाककृती मोठ्या अधिकार वाणीने सादर करतात. इथे दिलेली मालवणी सागुतीची कृती ही स्वतः एकदा घरच्या घरी ही कृती नक्की करून पहा. सूचना: कोंबडी गावठी (देशी) असावी. ब्रोयलर नको. मेरीनेशन साठी लिंबू - दही वगैरे मुळीच वापरू नये. यात टोमाटोचा वापर करू नये, मालवणी चिकन सागुती शिजवण्यासाठी कडकडीत गरम पाणीच वापरावे. गावठी (देशी) कोंबडी - १ किलो, चांगला नारळ - १, किसलेले सुके खोबरे - १ वाटी, मध्यम आकाराचे कांदे - ६, खोबरेल तेल - १ मध्यम वाटी, मालवणी भाजका मसाला - ६ ते ७ चमचे, हळद पूड - १ चमचा, धणे - अर्धी वाटी - ६ चमचे, बडीशेप - २ चमचे, मिरी - अर्धा चमचा, लवंग - अर्धा चमचा, जायपत्री - अर्धा चमचा, खसखस - २ चमचे, दालचिनी - १ इंच,चक्रीफुल - १ ते २, जायफळ- अर्धे, हिरवी वेलची - ४, मासला वेलची - २, आले - २ इंच, मीठ (चावी नुसार) - ५ चमचे, पूर्व तयारी : प्रथम नारळ फोडून बारीक किसून घ्यावा. कोंबडीचे मध्यम (साधारण १ इंच) आकाराचे तुकडे करून स्वच्छ धुऊन नंतर निथळून घ्यावेत. नंतर अगदी थोड्या पाण्यात अर्धा चमचा मीठ, हळद पूड, थोडे ओले खोबरे व आले यांचे वाटण करून या तुकड्यांना लाऊन ठेवावे. ३ कांदे बारीक उभे चिरावेत आणि उरलेले कांदे फोडणीसाठी बारीक चौकोनी चिरून ठेवावेत. कृती किसलेले सुके खोबरे सर्व साबूत मसाला - धणे, बडीशेप, मिरी, लवंग, जायपत्री, खसखस, दालचिनी, चक्रीफुल, जायफळ, हिरवी वेलची, मासला वेलची थोड्याशा तेलावर एकत्र भाजून बारीक वाटण करावे. उभा चिरलेला कांदा व नारळाचे खोबरे एकत्र खमंग भाजून बारीक वाटण करावे. जाड बुडाच्या पातेल्यात खोबरेल तेलाची फोडणी करून त्यात फोडणी साठीचा कांदा परतून घ्यावा. सर्व भाजका मासला व सुक्या खोबऱ्याचे निम्मे वाटण कोंबडीच्या तुकड्यांना लाऊन वरील फोडणीत हे तुकडे खरपूस परतून घ्यावेत. नंतर ५ ते ६ वाट्या कडकडीत गरम पाणी त्यात घालून घट्ट झाकण लावावे व १५ ते २० मिनिटे मध्यम आचेवर शिजू द्यावे. मधून ढवळत रहावे. नीट शिजल्यावर ओल्या नारळाचे वाटण व उरलेले सुक्या खोबऱ्याचे वाटण आणि मीठ घालून परत ५ - १० मिनिटे शिजू द्यावे. आवश्यकते नुसार किंवा वाढवण्यासाठी पुन्हा गरम पाणी व मीठ घालावे. आवडत असल्यास एक वाटी ओल्या खोबऱ्याचा रस घालावा. वरून कोथिंबीर चिरून घालावी.

# सीना माढा व दहिगाव सिंचन योजना पडल्या बंद

## आता सगळी भिस्त पावसावर, राजकारण्यांच्या खेळात शेतकर्यांचे प्रचंड नुकसान



**शिव निर्णय**/बेंबळे : उजनीतून भीमा नदीत ६००० क्युसेक्सने पाणी सोडल्यामुळे जलाशयाची पाणी पातळी तातडीने खालावली आणि सीनामाढा आणि दहिगाव सह इतर अनेक सिंचन योजना बंद पडल्या असून हजारो एकर लाभक्षेत्राला पाण्यासाठी यापुढे फक्त आणि फक्त पावसाची वाट पहावी लागणार आहे, सध्या मात्र प्रचंड उष्णतामानामुळे या सिंचन योजनेच्या हजारो एकर लाभक्षेत्रातील पिकांची जळून राख होणार शेतकऱ्यांची प्रचंड हानी होणार असे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

यावर्षी ही परिस्थिती उद्भवण्यास कारण काय...? कुणामुळे ही परिस्थिती उद्भवली...? याचे उत्तर म्हणजे राजकीय पदाधिकाऱ्यांनी स्वतःच्या मोठेपणासाठी वरिष्ठां कडून जलसंपदाच्या अधिकाऱ्यांवर पाणी सोडण्यासाठी दबाव आणून हजारो एकर क्षेत्र पाण्यापासून वंचित ठेवले आहे ,हे कोणीही नाकारू शकणार नाही.

सोलापूरला पाणीपुरवठा करण्यासाठी समांतर पाईपलाईन कार्यान्वित झाल्यामुळे यावर्षी जलाशयात १२ टीएमसी पाण्याची बचत झालेली आहे. मार्च महिन्यात भीमा नदीतून पाणी सोडून नदीतील सर्व बंधारे भरून घेतले होते ,त्यामुळे मेअखेर किंवा १० ते १२ जून पर्यंत पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी कमी पडणार नव्हते हे राजकारणी मंडळी आणि जलसंपदाचे अधिकारी देखील कबूल करत होते व शेतकरी खुश होते परंतु 'दैव देते पण कर्म नेते' अशी सध्याची शेतकऱ्याची स्थिती दिसून येत आहे. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्याच्या लोकप्रतिनिधी भीमा नदीकाठच्या नागरिकांना पिण्यासाठी नदीतून पाणी सोडावे यासाठी पालकमंत्र्यांच्या मार्फत जलसंपदा



अधिकाऱ्यावर दबावाचे राजकारण केले व २४ एप्रिल पासून ६००० क्युसेक्स ने भीमा नदीत पाणी सोडणे भाग पाडले व माढा मोहोळ करमाळा पंढरपूर सांगोला येथील लोकप्रतिनिधी गप्प बसून राहिले.

वास्तविक १२ ते १५ मे पर्यंत भीमा नदीकाठच्या गावांना पिण्यासाठी पुरेल एवढे पाणी नदीतील प्रत्येक बंधाऱ्यात उपलब्ध होते ही वस्तुस्थिती सर्वांना माहीत होती, परंतु ती डावलून व दुर्लक्ष करून केवळ सोलापूरच्या पुढे अक्कलकोट तालुक्यातून कर्नाटक राज्यात पाणी जावे आणि आपली लोकप्रियता कायम राहावी याच हेतूने सोलापूर आणि अक्कलकोट च्या राजकीय पदाधिकाऱ्यांनी दबाव आणला अशी सर्वत्र चर्चा होत आहे, परंतु याचा परिणाम म्हणजे जलाशयातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होऊ लागली आणि ती ४९० . ८३० मीटर पर्यंत आली आणि सीना माढा व दहिगाव या मोठ्या सिंचन योजना बंद पडल्या. परंतु या सर्व परिस्थितीमुळे सीना माढा वरील ५४ हजार एकर व दहीगाव वरील १६ हजार एकर असे एकूण ७० हजार एकर क्षेत्राला ऐन उन्हाळ्यात पाण्यापासून वंचित राहावे लागणार आहे, आता फक्त पावसाचीच वाट पाहणे एवढेच शेतकऱ्यांच्या नशिबी उरले आहे.

वास्तविक धरण जलाशयात मायनस -३०% -४० किंवा -५०% पर्यंत गेले तरी उजनी धरणाच्या गाळ मोर्यातून देखील नदीत पाणी सोडता येते... मग आताच घाई का झाली..? याचे उत्तर सोलापूर व अक्कलकोटच्या लोकप्रतिनिधी व पालक मंत्र्यांनी देणे आवश्यक आहे . उजनीतील पाणी नियोजन विस्कळीत होण्याचे व पिके जळून जाण्याचे खापर जलसंपदा अधिकाऱ्यावर फोडून राजकारण्यांनी आपला दुबळेपणा किंवा खोटारडेपणा झाकण्याचा प्रयत्न करू नये अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे।.

ज्यावेळेस सोलापूरला पाणीपुरवठा करण्यात येत होता तेंव्हा एका वेळेस साडेपाच ते सहा टीएमसी पाणी सोडण्यात येत होते व औंज,टाकळी, चिंचपूरपर्यंतचे बंधारे भरून घेतले जात होते, मग यावेळेस सात टीएमसी पाणी सोडण्याची गरज काय....? याचं उत्तरही राजकारण्यांनी देणे भाग आहे . शेवटी या सर्व परिस्थिती पुढे सीना माढा आणि दहिगाव सारख्या इतर अनेक सिंचन योजने खालील शेतकरी हातबल झाले आहेत.

**पाणी बंद होणार ....**

७ मे पर्यंत नदीतून व २४ मे पर्यंत कालव्यातून पाणी सोडणे बंद होणार आहे असे नियंत्रण कक्षातून कळते .कालवा दरवाजाची तळपातळी( एमडीडीएल) ४८७.८३० मीटर पर्यंत खाली आहे. अद्यापही धरणामध्ये जिवंत साठ्यातील ६२ टीएमसी पाणी शिल्लक असून मृतसाठ्यात मात्र मायनस -२.५८% म्हणजेच मायनस - १.३८ टीएमसी पाणी उपलब्ध आहे.

# फणस खाण्याचे फायदे



फणस हे एकमेव असं फळ आहे जे अबाल-वृद्धांपासून साऱ्यांनाच आवडतं. बाहेरुन कितीही काटे असले तरी आत रसाळ गोड गरे असतात. त्यामुळे फणस हा अनेकांच्या आवडीचा असतो. साधारणपणे फणस गोड लागतो किंवा त्यांची एक खास चव असते त्यामुळे तो खाल्ला जातो. परंतु, फणस खाण्याचे अनेक शारीरिक फायदे आहेत. त्यामुळे फणसपोळी, फणसाचा गर, सरबत या सारख्या विविध पदार्थांमधून गृहिणी आपल्या कुटुंबाला फणस खायला देतात. त्यामुळे फणस खाण्याचे नेमके फायदे कोणते ते पाहुयात

फणस खाण्याचे फायदे फणसामुळे शरीराची योग्य वाढ होण्यास मदत मिळते.अशक्तपणा, जुना ताप दूर होतो. अतिसार होत असल्यास उपयोगी.शारीरिक ताकद वाढते. सांधेदुखी असल्यास फणसाची कोवळी पानं गरम करुन त्याचा सांध्यावर शेक द्यावा.

शरीरावर मोठे फोड किंवा बेंड झाल्यास त्यावर फणसाचा चीक लावावा. त्यामुळे सूज कमी होऊन पू बाहेर पडतो.

# बोध कथा : कोल्हा आणि सारस

एका जंगलात एक हुशार कोल्हा राहायचा. त्याला इतरांना फसवण्यात फार आनंद वाटायचा. त्या कोल्ह्याची मैत्री एका सारसशी होते. तो सारस फार भोळा होता. एके दिवशी कोल्ह्याने विचार केला की या सारसाशी थट्टा मस्करी करावी. हा विचार करून कोल्हा सारस कडे जाऊन म्हणाला - 'मित्रा उद्या माझ्याकडे जेवायला ये. 'धन्यवाद मित्रा आपण मला जेवण्याचे आमंत्रण दिले मी नक्की येईन.' सारस म्हणाला.

ठरलेल्या वेळी सारस कोल्ह्याकडे जेवायला जातो. जेवण्याची वेळ आल्यावर कोल्ह्याने ठरविल्या प्रमाणे सारस ला ताटलीत सूप पिण्यासाठी दिले. सूप ताटलीत पिणे हे काही समस्या नव्हती, पण सारस फक्त त्याच्या लांब चोचीचे टोकच त्या सुपात बुडवू शकला. त्याला सूप पीता येत नव्हते कारण कोल्ह्याने दिलेली ताटली पसरट होती आणि सारस ची चोच लांब होती. कोल्हा तर पटापट सूप पिऊन गेला आणि सारस बिचारा उपाशी राहिला.

सारसला फार लाजिरवाणे झाले. त्या कोल्ह्याने त्याचा अपमान केला आहे हे त्याच्या लक्षात आले. त्याला समजले की कोल्ह्याने त्याची थट्टा मस्करी करण्यासाठीच त्याला जेवण्याचे आमंत्रण दिले होते. इथे कोल्ह्याने त्याला विचारले की 'अरे मित्रा तू काहीच खात नाही तुला जेवण आवडले नाही का? तर सारस म्हणाला- 'धन्यवाद मित्रा मला जेवण फार चविष्ट आहे' तू देखील माझ्याकडे जेवायला ये आणि जेवण्याचा आनंद घे' सारस ने विचार केला की ह्या लबाड कोल्ह्याला त्याच्या केलेल्या कृत्याची शिक्षा मिळाली पाहिजे. ह्याने जो माझा अपमान केला आहे मी त्याची परतफेड त्याला देणारच.

दुसऱ्याच दिवशी कोल्हा सारसच्या घरी जेवायला जातो. तो आपल्यासह सारस ला देण्यासाठी काहीही भेट वस्तू आणत नाही.'आता तर मी भरपूर जेवणार' असा विचार कोल्हा करीत होता.सारस ने देखील जेवण्यासाठी सूप बनविले होते. सूपचा मस्त सुवास घरात दरवळत होता त्या कोल्ह्याची वासानेच भूक वाढली. त्याने बघितले तर काय सारस ने एका लांबोळ खोल अशा पात्रात सूप दिले होते. सारस ची चोंच लांब असल्यामुळे तो सहजपणे त्या पात्रातून सूप पीत होता. पण कोल्ह्याचे तोंड त्यामध्ये जातच नव्हते. बरेच प्रयत्न केल्यावर देखील कोल्हा सूप काही पिऊ शकला नाही आणि त्याला उपाशीच राहावे लागले. सारस ने न बोलता आपल्या अपमानाची परतफेड केली आणि त्याची खोड मोडली.

तात्पर्य : जश्याच तसे

# संत्र्याच्या सालांनी घ्या त्वचेची काळजी

या हंगामात त्वचा रुक्ष कोरडी आणि निर्जीव होते. या शिवाय चेहऱ्याची चमक आणि सौंदर्य देखील कमी होऊ लागते. अशा परिस्थितीत लोक विविध प्रकाराच्या पद्धती अवलंबवतात. काही लोक महागड्या सौंदर्य उत्पादनांचा वापर करतात तर काही लोक शस्त्रक्रिया करवतात. तर सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी व्हिटॅमिन सी सर्वोत्तम मानले आहे.त्वचेचे तज्ज्ञ म्हणतात की संत्र्यामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. म्हणून हे त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. संत्र्याचे साल देखील त्वचेसाठी फायदेशीर होऊ शकतो. या मध्ये असलेले कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि अँटी बेक्टेरियल गुणधर्म त्वचेच्या बऱ्याच समस्यांना दूर करण्यात उपयुक्त आहे. हिवाळ्यात होणाऱ्या त्वचेशी निगडित त्रासाला संत्र्याच्या सालीने दूर केले जाऊ शकते. अशा प्रकारे बनवा संत्र्याच्या सालीची भुकटी - हे बनविण्यासाठी आपल्याला दोन ते चार संत्रे लागतील. या साठी संत्र्याचे साल उन्हात वाळण्यासाठी ठेवा. पूर्णपणे वाळल्यावर मिक्सर मध्ये वाटून घ्या आता

एक चमचा पूड वाटीमध्ये घेऊन या मध्ये थोडंसं गुलाबपाणी आणि २ मोठे चमचे हळद मिसळून ह्याची पेस्ट बनवून घ्या.

अशा प्रकारे पूड चेहऱ्यावर वापरा - संत्र्याच्या सालीने बनलेली पूड चेहऱ्यावर वापरण्या पूर्वी चेहरा पाण्याने धुऊन घ्या. डोळ्या ला आणि ओठांना वगळता ही पेस्ट संपूर्ण चेहऱ्यावर लावा आणि १५ मिनिटे तसेच सोडा. नंतर कोमट पाण्याने चेहरा धुऊन घ्या आणि स्वच्छ कपड्याने चेहरा स्वच्छ करा. या मुळे आपल्या चेहऱ्यावर चकाकी आणि तजेलपणा येईल.

तेलकट त्वचे साठी पॅक असा बनवा- त्वचेचे तज्ज्ञ म्हणतात की तेलकट त्वचेमुळे अनेक समस्या होऊ शकतात. हे बनविण्यासाठी एका वाटीत १ मोठे चमचे संत्र्याच्या सालाची पूड आणि १ चमचा दूध किंवा दही मिसळून पॅक तयार करा. आता हे पॅक आपल्या चेहऱ्याला चांगल्या प्रकारे लावा हे पॅक वाळल्यावर कोमट पाण्याने चेहरा धुऊन घ्या. अशा प्रकारे आठवड्यातून किमान २ किंवा ३ वेळा करून आपल्याला चेहऱ्यात बदल जाणवेल. काहीच महिन्यात चेहरा डाग मुक्त असेल.

डल किंवा निस्तेज चेहऱ्यावर अशी चमक आणा - चेहऱ्याच्या समस्यां असल्यामुळे चेहरा निस्तेज



होतो. त्यावरील चमक नाहीशी होते. चेहऱ्यावरील चमक पुन्हा आणण्यासाठी आवश्यक आहे संत्र्याचे सेवन करण्यासह त्याचा वापर चेहऱ्यावर देखील करावे. या साठी आपल्याला संत्र्याच्या सालीची पूड आणि दोन मोठे चमचे मधाची गरज आहे. हे दोन्ही एकत्र मिसळा. आता या पेस्टला चेहऱ्यावर आणि मानेवर लावून सुकू द्या. नंतर चेहरा आणि मान कोमट पाण्याने धुऊन घ्या. या मुळे आपल्या चेहऱ्यावर तेज येईल आणि आपले सौंदर्य उजळून निघेल.

# घराला कीटकांपासून मुक्त

घरात कीटक होण्याचे मुख्य कारण म्हणजे घराची चांगल्या प्रकारे स्वच्छता न होणे. अश्या परिस्थितीत कीटक अनेक आजारांना आमंत्रण देतात. घरात माशी आणि मुंग्या न होण्यासाठी दररोज लादीवर फिनाईल आणि तुरटीचं पावडर मिसळून नियमितपणाने पुसल्याने हळू-हळू हे नाहीसे होतात. आपण ऐकले असणारच की घरात मोरपीस लावल्याने कीटकांचं येणं कमी होत. आपल्याला या कीटकांपासून सुटका हवा असल्यास घरात मोरपीस लावा.

आपण ते घराच्या आत आणि मुख्य प्रवेश दारावर लावावं. जर आपण घरात पालीपासून त्रस्त झाला असल्यास तर अंडींच्या सालींना भितींमध्ये अडकवून ठेवावं. अश्या पद्धतीने हे ठेवा की ते पडणार नाही. स्वयंपाकघरातील माश्या-डास काढण्यासाठी १ चमचा कॉफी पावडरला तव्यावर जाळून धूर देणे.जेवणाच्या टेबलावरून माश्या काढण्यासाठी टेबलाच्या मध्यभागी पुदिन्याच्या पानांचे ताजे गुच्छ ठेवा. घराच्या मध्यभागी कापराचा धूर द्यावा. यामुळे घरात त्याचा वास तर राहीलच, तसेच माशी- डास देखील कमी होतील.कीटकांना काढून टाकण्यासाठी काही योग्य वनस्पती आहेत, जसे की तुळस, पुदिना आणि ओवा याची घरात आवर्जून लागवणं करा.

# थंड की गरम? केस धुण्यासाठी कोणते पाणी ठरेल लाभदायक

गरम पाण्याने आंघोळ केल्यानं केसांसह त्वचेचंही भरपूर प्रमाणात नुकसान होतं. गरम पाण्याऐवजी थंड पाण्याने पाण्याने केस धुवावे. थंड पाण्याने आंघोळ केल्यास त्वचा आणि केसांना प्रचंड फायदे मिळतात. केस चांगले असताना आपण त्यांची योग्य ती देखभाल करत नाही. केसांशी संबंधित समस्या उद्भवल्यानंतरच त्यांची काळजी घेण्यासाठी प्रत्येकाला जाग येते. केसगळती रोखण्यासाठी लोक नको-नको ते उपाय करून पाहतात. केस घनदाट, लांबसडक, काळेशार आणि मजबूत व्हावे, यासाठी हेअर स्पापासून ते महागड्या शॅम्पू, कंडिशनरचा वापर केला जातो. केस (काळी उरीश) निरोगी असतील तर आपल्या सौंदर्यामध्येही भर पडते.

केसांचे नुकसान टाळण्यासाठी तेल मसाजसह आहारामध्ये पौष्टिक पदार्थांचा समावेश करावा. केस खराब झाल्यानंतर काळजी घेण्याऐवजी केस खराब होऊ नये म्हणून आधीपासूनच काळजी घ्या. दरम्यान, काही जणांना केस धुण्याची योग्य पद्धत देखील माहिती नसते. उदाहरणार्थ केस धुण्यासाठी गरम पाणी की थंड वापरावे? हा प्रश्न प्रत्येक महिलेच्या मनात असावा. गरम पाण्याने आंघोळ केल्यानं शरीराला आराम मिळतो, ही बाब खरी आहे. पण केस धुण्यासाठी गरम की थंड पाणी वापरावे? यावरून तुमचाही गोंधळ होत आहे का. याबाबत जाणून घेऊया सविस्तर माहिती.

गरम पाण्याचा वापर टाळावा, कारण.. सर्व प्रथम आपण समजून घेतले पाहिजे की आपल्या शरीरासाठी गरम पाणी कशा पद्धतीनं काम करते. गरम पाण्यामुळे आपल्या रोमछिद्रांमधील दुर्गंध स्वच्छ होते तसंच टाळूची त्वचा देखील स्वच्छ होते. पण यामुळे नैसर्गिक तेल कमी होऊन केस कोरडे होऊ लागतात. याव्यतिरिक्त टाळूच्या त्वचेवरील पोअर्स मोकळी झाल्याने केसांच्या मुळांवर वाईट परिणाम होतो. यामुळे केस कमकुवत होतात. परिणामी केस गळणे, तुटणे, केस कोरडे तसंच निर्जीव होणे इत्यादी समस्या निर्माण होतात. हे नुकसान टाळण्यासाठी केस धुताना अति गरम पाण्याचा वापर करणं टाळावे. (चेहरा व केसांच्या सौंदर्यासाठी संजीवनी ठरेल हे घरगुती आयुर्वेदिक तेल)

केस तुटण्यामागील कारणे कोमट पाण्यानेही केसांना तितकेसे फायदे मिळत नाहीत. कोमट पाण्यामुळे केसांमधील नैसर्गिक तेलावर परिणाम होतात. केसांमधील नैसर्गिक ओलावा कमी होऊन ते कोरडे होतात. थंड पाण्याने आंघोळ करणं शक्य होत नसल्यास हलक्या गरम पाण्याचा वापर करावा. केसांच्या आरोग्यावर कोणतेही परिणाम होऊ नये, यासाठी ही खबरदारी घेणे आवश्यक आहे. केसांना कंडिशन लावल्यानंतरही गरम



पाण्याने आंघोळ करण्याची चूक करू नका. गरम पाण्याने आंघोळ केल्यास केसांवर कंडिशनर लावल्याचा कोणताही सकारात्मक परिणाम होत नाही. उलट केसांचे नुकसानच अधिक होते. यामुळे केसगळतीची समस्या उद्भवते. आपल्या हातांवर शॅम्पू घ्या आणि यानंतर केसांवर शॅम्पू लावून हलक्या हातानं केसांचा मसाज करा. केस रगडून धुण्याची सवय वेळीच बंद करावी. हातांनी जोर देऊन केस धुतल्यास ते तुटतात तसंच गळतात. आपल्या त्वचेप्रमाणेच केसांचीही काळजी घ्यावी. थंड पाण्यामुळे टाळूच्या त्वचेवरील रोमछिंद्र बंद होतात. शिवाय केसांमधील ओलावा देखील टिकून राहतो. टाळूची त्वचा निरोगी राहते. यामुळे कोंड्याची समस्या उद्भवत नाही. थंड पाण्यामुळे रक्त प्रवाह सुद्धा वाढतो. रक्त प्रवाह वाढल्याने केसांचे आरोग्य सुधारते. केस मजबूत, चमकदार आणि घनदाट होतात.


## सोलापूर जिल्ह्यातील तालुका व ग्रामीण भागासाठी प्रतिनिधी नेमणे आहे

**दैनिक शिव निर्णय** या वृत्तपत्रासाठी बार्शी, वैराग, पांगरी, उपळे दुमाला, कुर्डूवाडी, मोडनिंब, सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर, करकंब, द.सोलापूर, करजगी, उ.सोलापुर वडाळा, करमाळा, जेऊर, , माळशिरस आदी तालुका प्रतिनिधी तसेच तालुक्यातील ग्रामीण भागासाठी ग्रामीण प्रतिनिधीची तात्काळ नेमणूक करावयाचे आहे. तरी लेखनाची आवड असणाऱ्यांनी तात्काळ खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा. अनुभवास प्राधान्य.

**संपर्क मो. ९९२३४५६७९६, श्री.अनिल शिराळकर**


# सुधागड किल्ला

या गावाच्या पूर्वेस हा किल्ला आहे. सुधागड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे.सुधागड म्हणजे भोर संस्थानाचे वैभव. पूर्वी या गडाला भोरप१ असेही म्हणत असत. पुढे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री शिवछत्रपतींचा पदस्पर्श या गडाला झाला आणि याचे नाव सुधागड ठेवले गेले. या गडाची साधारणतः उंची ५९० मीटर आहे. झाडांमध्ये लपलेला हा गड विस्ताराने फारच मोठा आहे. या गडावर जाण्यासाठी तीन प्रमुख वाटा आहेत.

सुधागड हा किल्ला फार प्राचीन आहे. या परिसरात अस्तित्वात असणारी ठाणाळे लेणी, ही २२०० वर्षांपूर्वीची आहेत. यावरून असे अनुमान निघते की सुधागड हा देखील तितकाच जुना किल्ला असावा. संदर्भ हवा पुराणात भृगु ऋषींनी येथे वास्तव्य केल्याचे अनेक उल्लेख आढळतात. याच ऋषींनी भोराई देवीची स्थापना या डोंगरावर केली. संदर्भ हवा

शिवाजी महाराजांनी १६५७-५८ मध्ये जेव्हा आदिलशाही मुलुख जिंकला त्या वेळी सुधागडावर हा किल्ला स्वराज्यात सामील झाला असावा.नारो मुकुंद सबनीस यांच्या कडे गड होता.२ शिवरायांनी या गडाचे भोरपवरून सुधागड असे नामकरण केले. राजधानीसाठी याही गडाचा विचार शिवरायांनी केला होता, असे सांगितले जाते.

इ.स. १६९४ साली याबाबत असा उल्लेख आढळतो की, 'साखरदर्यात मालवजी नाईक कारके यांनी माळ लाविली. सरदार मालोजी भोसले यांच्या हाताखाली जाधव आणि सरनाईक हे प्रथम किल्ल्यावर चढले. या धारकर्यांना उभे करून त्यांचे पाठीवर हैबतराव चढले. त्यास संभाजीराव पुढे जाऊन माथा गेले. पंचविसाने पुढे जाऊन गस्त मारिली. बोकडसिलेचा पहारा मारला. पुढे भोराईच्या टप्प्यावरी गेले तो सदरेतून किल्लेदार व लोक धावत आले. हाणहाण झाली त्या समयी किल्लेदार कामास आले. उपरांतिक जाऊन सदर काबीज केली.'गडाच्या पायथ्याशी असलेल्या 'पाच्छापूर' या गावातच छत्रपती संभाजी राजे व औरंगजेबाचा बंडखोर मुलगा अकबर याची भेट झाली होती. महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात असलेल्यांपैकी अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस, त्याचा मुलगा आवजी बल्लाळ, आणि हिरोजी फर्जंद या सर्वांना भाद्रपद पौर्णिमेच्या दिवशी छत्रपती संभाजी राजांनी सुधागड परिसरात असणार्या परली गावात हत्तीच्या पायी दिले.

या गडाचा घेरा मोठा आहे. गडावर पाण्याचे अनेक तलाव आढळतात.गडावर पंत सचिवांचा वाडा आहे, तसेच भोराई देवीचे मंदिर आहे. येथे जंगलही बर्यापैकी आहे. आजुबाजूच्या जंगलाच्या परिसरात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आढळतात. गडावरील पंत सचिवांच्या वाडाच्या बाजूला भोरेश्वराचे मंदिर आहे. तिथूनच पुढे गेल्यावर एक चोरदरवाजाची विहीर आहे. सचिवांच्या वाडापासून पुढे पायर्यांची वाट जाते आणि सरळ भोराई देवीच्या मंदिरात. जर ही वाट सोडून खालची वाट पकडली तर पुढे पाण्याची टाकी आहेत. या टाक्यांतील पाणी पिण्यासाठी उपयुक्त आहे. टाक्यांच्या डावीकडील वाट ही चोर दरवाज्यांकडे जात असे. ही



वाट आता अस्तित्वात नाही.

पाच्छापूर दरवाजा : या दरवाज्यातून गडावर शिरल्यास थोडे चढल्यावर माणूस एका पठारावर पोहोचतो. पठाराच्या डावीकडे सिद्धेश्वराचे मंदिर ,तसेच धान्याची कोठारे, भाडांचे टाके, हवालदार तळे व हत्तीमाळ आहे. उजवीकडे गडाची नैसर्गिक तटबंदी बघावयास मिळते.

गडावरील टकमक टोक : वाडापासून आपण पायर्यांच्या साह्याने वर आले की उजवीकडची वाट हत्तीपागांमधून जाऊन, सरळ एका टोकावर पोहचते. रायगडावरील 'टकमक' टोकासारखेच हे टोक आहे. या टोकावर उभे राहिल्यावर समोरच उभा असणारा घनगड , कोरीगड, तैलबैल्या दिसतो. तसेच अंबा नदी व नदीच्या आजुबाजूची गावे हा परिसर दिसतो.

सवाष्णीचा घाट : तैलबैला गावातून सरळ धोंडसे या गावी यावे. अथवा पाली गाव ते धोंडसे गाव हे अंतरही १२ कि.मी. आहे. पालीहून धोंडसे गावी यावे. तिथून गडावर जाण्यासाठी ३ तास लागतात.या वाटेने आपण दिंडी दरवाजात येतो.

## सहज...

दोषदुजा कशास्तव
मीच फसलो सहज
प्रवृत्तकरतो चोरास
उघडा ठेवला ऐवज

नितीमत्ता दडूनबसे
गुन्हा घडवितें गरज
लोभस वस्तु खुणवे
निखळून पडे धीरज

कुणा नसतो अंकुश
योग्य वेळी दे समज
शुध्दी बुध्दी हरवली
होवूनजाय असमज

अडकताजाळ्यामधे
कितीकरतो गजबज
लिलाव चाले अब्रुचा
बाजारात रे बजबज

आंधळे करे डोळसां
अंधश्रद्धा क्रूरआरज
काळसर्पी गिळकृती
उच्च शिक्षीत सावज

मलिन होते क्षणार्धा
जपले चारित्र्य नीरज
अघोरीनिर्लज्ज पूजा
थरारु टाकले काळज

कळले नाही कधी ते
डागाळले मन विरज
चारित्र्य हनन मनस्वी
मातीमोल हो दिग्गज

– हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६.


दैनिक
शिव निर्णय

जाहीर नोटीस आता
फक्त ५००/- रूपयात
दोन कॉलम १० सेंमी
१०००/- रूपयात तर
प्रती स्के.से.मी.३२/-
नांवात बदल
३००/-

: संपर्क :
दैनिक शिव निर्णय
ब्लॉक नं.९, मंत्री चंडक पार्क, हॉटेल बालाजी सरोवर समोर, आसरा चौक, सोलापूर
मो. ९९२३४५३७९६

# सोलापुरात १६ वर्षीय मुलीचे अपहरण; २१ दिवसांनंतरही शोध नाही, कुटुंबाचे उपोषण

**शिव निर्णय**/ सोलापूर : अल्पवयीन मुलीचा २१ दिवसांनंतरही शोध न लागल्याने कुटुंबियांच्या संयमाचा बांध फुटला. कथित मानहानीला न घाबरता कुटुंबीय उघडपणे पुढे आले आणि त्यांनी मंद्रूप पोलिस ठाण्यासमोर बुधवारी उपोषण केले. या प्रकरणात एका आमदारासह जिल्हा परिषद सदस्याचा मंद्रूप पोलिसांवर दबाव असल्याचा गंभीर आरोप अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीच्या कुटुंबियांनी केला.

मंद्रूप येथील १६ वर्षे ९ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचे १५ एप्रिल रोजी पहाटे पाचच्या सुमारास अपहरण झाले. शोध घेऊनही मुलगी सापडली नाही. त्यामुळे कुटुंबियांनी दुपारी चारच्या सुमारास मंद्रूप पोलिसांना माहिती दिली. दुसऱ्या दिवशी, १६ एप्रिल रोजी दुपारी ३.२९ वाजता पोलिसांत रीतसर फिर्याद दाखल करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून कुटुंबियांना घेऊन



अकलूज, दौंड (जि.पुणे) व कळंब (जि. धाराशिव) परिसरात तपास केला; मात्र मुलीचा शोध लागला नाही.

तपासाबाबत समाधान न झाल्यामुळे फौजदार विद्यासागर सोनकांबळे, हवालदार सचिन मसलखांब आणि पोलिस कॉन्स्टेबल माजिद शेख या पोलिस कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून कारवाई करण्याची मागणी कुटुंबियांनी केली होती. त्यानंतरही मुलीचा शोध लागला नाही. त्यामुळे कुटुंबियांनी पोलिस ठाण्यासमोर उपोषण सुरू केले.

या पार्श्वभूमीवर संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांकडून तपास काढून घेण्याचे आश्वासन सहाय्यक पोलिस निरीक्षक शंकर पटवारी यांनी दिल्याचे कुटुंबियांनी सांगितले. तसेच, या प्रकरणाची गंभीर दखल घेत वरिष्ठांनी कडक समज दिली असून बेपत्ता मुलींच्या प्रकरणांचा प्राधान्याने तपास करण्याच्या सूचना पोलिस कर्मचाऱ्यांना दिल्याचे समजते.

पोलिसांकडून आकडेवारीची लपवाछपवी? या प्रकरणाचा तपास मी स्वतः करणार आहे. आमच्यावर कोणाचाही दबाव नाही आणि तो आम्ही जुमानत नाही. लवकरच मुलीचा शोध घेऊ, असे पोलिस निरीक्षक शंकर पटवारी यांनी सांगितले. जानेवारीपासून मुलींच्या अपहरणाच्या सात घटना घडल्या असून त्यापैकी सहा मुलींचा शोध लागला असून ही एकच मुलगी अद्याप सापडलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, उपलब्ध माहितीनुसार एकाहून अधिक मुलींचा अद्याप शोध लागलेला नाही. त्यामुळे पोलिसांकडून आकडेवारी लपवली जात असल्याचे दिसून येते.

**हस्तक्षेप करणारे आमदार कोण?**

मुलीचे अपहरण करणारा संशयित वेळापूर (ता. माळशिरस) येथील असल्याचा कुटुंबीयांचा दावा आहे. या प्रकरणात कारवाई होऊ नये म्हणून एका आमदारासह जिल्हा परिषद सदस्याने पोलिसांवर दबाव आणल्याचा आरोप मुलीच्या कुटुंबीयांनी केला आहे.

# मंगळवेढ्यात पहाटे एटीएम फोडून ७.७२ लाखांची चोरी; गस्ती पोलिसांनी पाठलाग केला पण चोरटे फरार

**शिव निर्णय**/ मंगळवेढा: शहराच्या पश्चिम भागातील शनिवार पेठेमध्ये आज पहाटेच्या सुमारास अज्ञात दरोडेखोरांनी येथील बॅंक ऑफ इंडीयाचे एटीएम मशीन गॅस कटरच्या साहाय्याने फोडून ७ लाख ७२ हजाराची रोकड लंपास केली.दरम्यान गस्त घालणारी पोलिसांची गाडी घटनास्थळी पोहोचली पोलिसांनी दरोडेखोरांचा पाठलाग केला.

पण अंधाराचा फायदा घेत दरोडेखोर पसार झाले. शहरवासीय झोपेत असताना शहरात खळबळ मिळाले आणि सध्या चोरीच्या घटनेचे प्रमाण वाढल्याने पोलिसासमोर चोरटे शोधण्याचे आव्हान आहे.

पहाटे ३:०० वाजण्याच्या सुमारास शनिवार पेठेतील एटीएम सेंटर दरोडेखोरांच्या निशाण्यावर आले. एटीएम मशीन फोडून त्यातील रोकड ताब्यात घेतली असताना पोलिसांचे



गस्ती पथक त्याच वेळी तेथून जात असताना त्यांना एटीएम सेंटरजवळ संशयास्पद हालचाली दिसल्या.पोलिसांची गाडी जवळ येताच दरोडेखोरांची यांच्याकडे असलेल्या चार चाकी वाहनातून एटीएम मधील रोख रक्कम घेऊन पळ काढला. गस्तीपथकातील पोलिसांनी दरोडेखोरांच्या वाहनाचा पाठलाग केला परंतु भरधाव वेगाने ते निघून गेले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर, पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. चौकशी आणखी ही रक्कम सात लाख ७२ हजार रुपये असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी या घटनेचा अत्यंत गांभीर्याने तपास सुरू केला.

शहराबाहेर जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर नाकाबंदी करण्यात आली असून, परिसरातील सीसीटीव्ही (उउढत) फुटेज तपासण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. चोरीचा शोध लावण्यासाठी तीन पथकाचे नियुक्ती करण्यात आल्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी सांगितले सध्या चोरीचे लोन ग्रामीण भागात देखील सुरू असल्याने ग्रामीण भागातील पोलीस पाटील व ग्राम रक्षक दल यांना सतर्क ठेवण्याची आवश्यकता नाही.

# उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातीच्या जागा जनरलला देऊ नयेत : केंद्रीय मंत्री रामदास आठवले



**शिव निर्णय**/अकलूज : उपवर्गीकरणामुळे कोणाही समाजावर अन्याय होणार नसला तरी अनुसूचित जातीच्या जागा जनरलला देऊ नये अशीच आपली भूमिका राहणार असल्याचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.पुढे ते म्हणाले की, उपवर्गीकरणाबाबत राज्याने स्थापन केलेल्या समितीचा अहवाल अद्याप आलेला नाही. मात्र लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वच जाती-धर्माच्या लोकांना आरक्षण देण्यात येणार असल्याने कोणावरही अन्याय होणार नाही.

राज्यात एससी मध्ये ५९ जाती असून आता होणाऱ्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात इतर जातींनाही आरक्षण मिळणार आहे. कोणत्याही जाती-धर्मांच्या वर अन्याय होऊ नये अशीच आपली ठाम भूमिका आहे. मात्र अनुसूचित जातीच्या जागा जनरलला देऊ नये यावर आपण ठाम आहोत.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपला चांगले यश मिळाले आहे, मात्र विजय मिळाला की ईव्हीएमचे नाव घेतात हे बरोबर नाही. ममता बॅनर्जींच्या राज्यात राजकीय हिंसाचार व महिलांवर अत्याचार वाढले होते, गत निवडणुकीत त्यांनी भावनिक साद घालून सत्ता मिळवली, मात्र यावेळेस भाजपला यश मिळाले. आपल्या पक्षाचाही भाजपला चांगला फायदा होत आहे,त्यामुळेच आपल्याला तिसऱ्यांदा राज्यसभा मिळाली.त्यानिमित्ताने आपण दिल्लीत रहात असल्याने आपला पक्षही अनेक राज्यात वाढला आहे. मणिपूर व नागालँड येथे आपल्या पक्षाला मान्यता मिळाली आहे शिवाय आपल्या पक्षास राष्ट्रीय म्हणून मान्यता मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे.येथील बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृहाच्या प्रश्नातही नक्की लक्ष घालण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.यावेळी अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, सुनील सर्वगोड, नंदकुमार केंगार, किरण धाईंजे, अजित मोरे, दया धाईंजे, श्यामराव भोसले, एन. के. साळवे, सुनील ओव्हाळ आदी उपस्थित होते.

# भांडीसंचासाठी मागितली लाच कंत्राटी दोन ऑपरेटर जेरबंद

## माढा तालुक्यातील उपळाई बुद्रूक येथील घटना

**शिव निर्णय**/ उपळाई बुद्रूक : बांधकाम कामगारांना शासनाकडून मोफत देण्यात येणाऱ्या गृहोपयोगी भांडी संचासाठी लाच मागणाऱ्या दोन जणांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी (ता. ६) सापळा रचून रंगेहात अटक केली.





माढा तालुक्यातील उपळाई बुद्रूक येथील महाराणी लक्ष्मीबाई विद्यालयाच्या आवारात ही कारवाई पार पडली.

याप्रकरणी संशयित विनोद विजय गाडेकर व दिनेश मनोहर वाघमारे अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे असून, ते भांडी वाटप केंद्रात ऑपरेटर म्हणून कार्यरत आहेत.तक्रारदार बांधकाम कामगाराने शासनाच्या योजनेअंतर्गत मोफत भांडी संच मिळावा, यासाठी २७ मार्च २०२६ रोजी अर्ज केला होता.

लाभ देण्यासाठी आरोपी गाडेकर यांनी सुरवातीला १२०० रुपयांची लाच मागितली. तडजोडीअंती ही मागणी ५०० रुपयांवर आली. याप्रकरणी तक्रारदाराने १६ एप्रिल रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली.

सापळा रचण्यात आला. बुधवारी सकाळी गाडेकर यांनी तक्रारदारास लाचेची रक्कम वाघमारे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानुसार वाघमारे यांनी पंचांसमक्ष ५०० रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने दोघांना ताब्यात घेतले. रात्री उशिरापर्यंत कारवाई करण्याचे काम सुरू होते.

# सोलापूर जिल्ह्यात सफाई कर्मचाऱ्यांसाठी मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करणे आवश्यक : शेरसिंग रुक्कानसिंग डागोर

**शिव निर्णय**/ सोलापूर : सफाई कर्मचाऱ्यांच्या समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्याकरिता केंद्र व राज्यशासन मिळून काम करीत आहेत; त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातही सफाई कर्मचाऱ्यांच्या पुर्नवसनाकरिता मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करावे , या मॉडेलची अंमलबजावणी राज्यात करण्यात येईल, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवन येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारण करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कुशाल जैन,सहायक आयुक्त समाज कल्याण श्रीमती सुलोचना सोनवणे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी तसेच विविध संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणाकरिता घरकुल, आरोग्य, शिक्षण, रोजगार आदी विषयांशी निगडित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने भरावयांच्या पदांबाबतची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. नगर विकास विभागाचे २२ ऑक्टोबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना लागू करण्यात आली असल्याने या आदेशाच्या दिनांकानंतर सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे असे सफाई कामगार आणि २२ ऑक्टोबर २००८ नंतर सेवेत असलेले जे सफाई कामगार मृत्यू झाले



आहेत अशा मृत सफाई कामगारांच्या पात्र वारसांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावी.

केंद्र व राज्यशासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्याकरिता शिबीरांचे आयोजन करावे. शिबीरे आयोजित करतांना सफाई कामगार क्षेत्रात कार्यरत अधिकृत संघटनांसोबत सोबत घ्यावे. विविध लोककल्याणकारी योजनांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी.

कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सेवांचा लाभ कॅशलेस सुविधांचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. सफाई कर्मचाऱ्यांशी निगडित प्रलंबित मार्गी लावून तसा अहवाल आयोगाकडे सादर करावा, अशा सूचना श्री. डागोर यांनी दिल्या.

सफाई कर्मचारी आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यात काम करण्यात येईल. यापूर्वीच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल लवकरात लवकर आयोगाकडे सादर करावा, असेही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बैठकीस उपस्थित विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

# जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून स्व गणना पूर्ण

## सोलापूरमध्ये १ ते ७ मे पर्यंत २० हजार १६५ स्वयं गणना करण्यात आल्या

**शिव निर्णय**/सोलापूर, सोलापूर जिल्हा संपूर्ण भारतात १ मे २०२६ पासून स्व गणना करण्यास सुरुवात झालेली आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतःची डिजिटल गणना यशस्वीरित्या पूर्ण केली. व जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी १५ मे २०२६ पर्यंत दिलेल्या https://se.census.gov.in या संकेतस्थळावर स्वतःची माहिती भरून स्व जनगणनेत सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.





सोलापूर जिल्ह्यात डिजिटल जनगणना २०२७ अंतर्गत स्वयं गणनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, जिल्ह्यातील पूर्णतेचे प्रमाण तब्बल ७९.८२ टक्के इतके झाले आहे. ७ मे २०२६ रोजी च्या अहवालानुसार, सोलापूरमध्ये एकूण २०,१६५ स्वयं गणना प्रक्रिया सुरू करण्यात आल्या असून त्यापैकी १६०९६ गणना यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या आहेत.

जिल्ह्यातील नागरिक डिजिटल माध्यमातून स्वतःची माहिती नोंदवून शासनाच्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद देत आहेत.

# सोलापूर जिल्हा परिषदेत गटनोंदणीला वेग

## मोहिते-पाटील गटाचा नवा राजकीय समीकरण, चार पक्ष आणि तीन आघाड्या

**शिव निर्णय**/ सोलापूर : जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत माळशिरसमधून विजयी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाच सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे गटनोंदणी केली आहे. गटनेतेपदी अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांची निवड झाली.

उपगटनेते म्हणून गौतम माने यांची निवड झाली आहे. जिल्हा परिषदेत स्वीकृत सदस्य निवडण्यासाठी राजपत्र प्रसिद्ध झाले. या निवडीत गटनेत्याच्या शिफारशीला महत्त्व असल्याने गटनोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली. या मुदतवाढीत मोहिते-पाटील गटाच्या पाच सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे गटनोंदणी केली आहे.

जिल्हा परिषदेचा निकाल प्रसिद्ध झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे गटनोंदणी आवश्यक आहे. माळशिरस तालुक्यात भाजपच्या विरोधात लढताना खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शप) ची आघाडी केली होती.

या आघाडीने ९ पैकी सात जागा जिंकल्या आहेत. या सात जागांमध्ये शिवसेनेचा एक, राष्ट्रवादीचा एक व राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पाच सदस्य विजयी झाले. यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाच सदस्यांनी गटनोंदणी केली आहे.

आघाड्यांवर ठरेल सातवी जागा

जिल्हा परिषदेच्या १० सदस्यांमागे एक स्वीकृत सदस्य निवडला जाणार आहे. संख्याबळ पाहता भाजपचे चार, शिवसेनेचा एक व राष्ट्रवादीचा एक सदस्य स्वीकृत सदस्य होऊ शकतो. सोलापूर विकास आघाडीच्या माध्यमातून आणखी एक सदस्य स्वीकृत करण्याची संधी आहे. आघाड्यांनी व राष्ट्रवादीने गणित जुळविल्यास सातव्या जागेची लॉटरी लागू शकते.



चार पक्ष आणि तीन आघाड्या

जिल्हा परिषदेच्या सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे गटनोंदणी केली आहे. त्यामध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष या चार पक्षांचे चार गट नोंदविण्यात आले आहेत. याशिवाय आमदार नारायण पाटील यांच्या सदस्यांनी करमाळा तालुका विकास आघाडी, आमदार बाबासाहेब देशमुख यांच्या सदस्यांनी सांगोला तालुका विकास आघाडी, तसेच आमदार देशमुख, आमदार नारायण पाटील व भगीरथ भालके यांच्या सहा सदस्यांनी एकत्र येऊन सोलापूर विकास आघाडीचीही नोंदणी केली आहे. सध्या चार पक्षांचे चार गट व तीन आघाड्यांची नोंदणी झालेली आहे. गटनोंदणीसाठी शनिवारी (ता. ९) अंतिम मुदत आहे.

# माढयातील श्री विठ्ठल मंदिरात त्रिदिवसीय कळसारोहण सोहळा

**शिव निर्णय**/माढा : कसबा पेठेतील श्री. विठ्ठल मंदिरात १२ ते १४ मे दरम्यान मंदिरावर कळसारोहण सोहळ्यानिमित्त त्रिदिवसीय हरिनाम सप्ताह व कीर्तन सोहळ्याचे आयोजन केले आहे.

मंगळवारी (ता. १२) प्रारंभ व शुद्धीकरण दिवस - या दिवशी शिवशंभू व्याख्याते कबीर महाराज आतार सायंकाळी ०८ ते १० या वेळेत कीर्तन होणार आहे. बुधवारी (ता. १३) संस्कार व अधिवास दिवस - सकाळी अकरा ते बारा या वेळेत संगीत गाथा पूजन, भजन, कळासारोहण समारंभाचे कळस धान्याधिवास, न्यासविधी, होम-हवन, मंदिर शिखर पूजन, ग्रामप्रक्षिणा व पालखी सोहळा होणार आहे. रात्री आठ ते दहा या वेळेत श्री योगीराज महाराज गोसावी यांची कीर्तन सेवा आहे. गुरुवारी (ता. १४) मुख्य कळसारोहण सोहळा आहे. सकाळी दहा ते बारा या वेळेत हे.भ.प. माऊली कदम महाराज यांची कीर्तन सेवा आहे. या दिवशी कळस न्यास, शुभ मुहूर्तावर कळसारोहण, ध्वजारोहण, महाआरती, पूर्णाहुती व महाप्रसाद आहे.कळसावर होण्याच्या समारंभाच्या सर्व विधीचा शुभारंभ आ. अभिजीत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. कळस रोहण समारंभाचे मुख्य विधी १४ मे रोजी सकाळी नऊ वाजता परमपूज्य रामानंद सरस्वती महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व परमपूज्य शिवचरणानंदजी महाराज चिंचगाव टेकडी व पांडुरंग महाराज तुपे खानापूर यांच्या शुभहस्ते होणार आहेत.

# जिल्हा परिषदेची भीस्त पाण्यासाठी 'जार' वरच या दैनिक शिव निर्णयच्या बातमीची दखल, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचे तातडीचे निर्देश

**शिव निर्णय/सोलापूर :** सोलापूर : सोलापूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातून जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य आणि नागरिक व शेतकरी विविध कामासाठी ग्रामीण भागातील अधिकारी कर्मचारी व नागरिकांना तसेच शेतकरी विविध कामासाठी जिल्हापरिषद कार्यालयात यावे लागते. सदरचे नागरिक अथवा शेतकरी जिल्हा परिषद मधे आल्या नंतर त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी गैर सोय होत होती या बाबत दैनिक शिव निर्णय या वृतपत्रातून बातमीच्या माद्यमातून प्रशासनाला जागे करण्याचे काम केले आणि त्याची तातडीने दखल जिल्हा परिषदचे उप अध्यक्ष यांनी संबंधित अधिकारी व कर्तचारी यांना जिल्हा परिषदच्या प्रमुख प्रवेश व्दारावर विचारपूस केली आणि तातडीने पाणी पुरवठा करण्याचे सुचविले. या मुळे जिल्हा परिषद कार्यायात धावपळ दिसून आली आणि संबंधित नागरिकात समाधान ही व्यक्त करण्यात आले.



मुख्यालयातील आरओ यंत्रणा बंद पडणे, प्रवेशद्वाराजवळील दोन्ही वॉटर कुलर नादुरुस्त अवस्थेत असणे आणि नागरिकांना पिण्यासाठी जारवर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे कर्मचारी, शेतकरी व नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात होती.

विशेष म्हणजे



सोलापूर जिल्हा परिषदेची भीस्त पाण्यासाठी 'जार' वरच

अनेकदा जार संपल्यानंतर नागरिकांना पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याच्या तक्रारी देखील समोर आल्या होत्या. उन्हाच्या तीव्रतेत ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची त्यामुळे मोठी गैरसोय होत होती.

या संदर्भातील दि. ७ मे २०२६ च्या वृत्त दैनिक शिव निर्णय मध्ये प्रसिद्ध होताच जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. त्यांनी प्रशासकीय शाखेचे शाखा अभियंता चेतन वाघमारे यांना तातडीने आदेश देत मुख्यालयातील नादुरुस्त आरओ यंत्रणा आणि वॉटर कुलर त्वरित दुरुस्त करण्याच्या सूचना दिल्या. तसेच मुख्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था उभी करावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. ''मुख्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागू नये. नादुरुस्त सुविधा त्वरित सुरू करून नागरिकांची गैरसोय थांबवावी,'' असे आदेश उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती समोर आली आहे.

''ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करणारी यंत्रणाच स्वतः पिण्याच्या पाण्यासाठी जारवर चालत असेल, तर ही गंभीर बाब आहे,'' अशा



प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहेत. त्यामुळे आता जिल्हा परिषद मुख्यालयातील 'जार संस्कृती' बंद होणार का, नागरिकांना नियमित आरओचे शुद्ध पाणी मिळणार का आणि बंद पडलेल्या सुविधा पुन्हा सुरू होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सोलापूरच्या विकासाच्या प्रमुख प्रश्नांवर पालकमंत्र्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक होणार

**शिव निर्णय**/सोलापूर, : पाणीपुरवठा, ५४ मीटर रस्ता, आयटी पार्क, वाहतूक कोंडी, बसस्थानक व आर्थिक लेखाजोखा यांसहसोलापूरच्या विकासाच्या प्रमुख प्रश्नांवर होणार पालकमंत्र्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक होणार सोलापूर : सोलापूर शहर व जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर आज शासकीय विश्रामगृह मध्ये प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या मान्यवर सदस्यांचे उपस्थित पार पडलेल्या बैठकीत एकमताने पालकमंत्र्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार आहे.

या बैठकीत शहरातील मूलभूत सुविधा, वाहतूक, पायाभूत विकास, नागरी नियोजन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक पारदर्शकतेबाबत सविस्तर चर्चा करण्यात येईल. बैठकीत सर्वप्रथम सोलापूर शहरातील दररोज होणारा पाणीपुरवठा व त्यासंदर्भातील नवीन निविदांबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच ५४ मीटर रस्त्याच्या पहिल्या टप्प्यातील दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करून उछ्ड हॉस्पिटल ते सोरगाव या दुसऱ्या टप्प्यातील कामाला त्वरित सुरुवात करण्याची मागणी करण्यात आली. सोलापूरसाठी प्रस्तावित आयटी पार्क प्रकल्पाबाबत नेमकी कोणती प्रगती झाली आहे, याची अधिकृत माहिती देण्याची मागणी उपस्थितांनी केली. शहरातील महिला व पुरुषांसाठी सार्वजनिक प्रसाधनगृहांच्या दयनीय अवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाच्या उदासीनतेवर



प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. जुळे सोलापूर भागाचा झपाट्याने वाढणारा विस्तार लक्षात घेता त्या भागासाठी स्वतंत्र महापालिका व विशेष प्राधिकरण तातडीने स्थापन करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तसेच सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये मैदान, सभागृह, बाग-बगीचे व सार्वजनिक मनोरंजन सुविधांबाबत प्रशासनाने दुर्लक्ष केल्याची बाब उपस्थित करण्यात आली. सोलापुरातील जुन्या एन.जी.मिल परिसरात आधुनिक सुविधांनी सुसज्ज अद्यावत बसस्थानक उभारण्याची मागणी देखील बैठकीत करण्यात आली. जुळे सोलापूरमधील कंबर तलाव व डी-मार्ट परिसरातील पुलांच्या रुंदीकरणाचे काम तातडीने हाती घेण्याची मागणी करण्यात आली.

# पाचही जणांचा जेवणाचा प्लान, हॉटेलहून परत-ताना काळचा घाला, तिघा मित्रांचा करुण अंत

**शिव निर्णय**/,सोलापूर : सोलापूर शहरातील पुणे नाका ते मार्केट यार्ड मार्गावर (हैदराबाद रोड) काल बुधवारी मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. तीन जीवलग मित्रांचा अपघातात मृत्यू झाला आहे. दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सोलापूर-हैदराबाद मार्गावर हा अपघात झाला आहे.

डी-मार्टपासून सुमारे ५०० मीटर अंतरावर मार्केट यार्डच्या दिशेने निघालेल्या एका भरधाव इरटीगा कारने एमएच १३ इके ७२०९ रस्त्यावर थांबलेल्या ट्रकला एमएच १३ सीयू ८६९९ पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यात कारमधील दोन मित्रांचा जागीच मृत्यू झाला आहे. १ जण गंभीर जखमी झाला होता. आज गुरुवारी सकाळी उपचारादरम्यान तिसऱ्या मित्राचा मृत्यू झाला आहे. शेखर सुरेकर (वय ३३, रा. कुमठा नाका, सोलापूर) आणि अमोल धैर्यशील येरटे (वय ४०, रा. दाळगे प्लॉट, भवानी पेठ, सोलापूर) यांचा जागीच मृत्यू झाला. कादर सैदू हांडे (वय ३३, रा. कुमठा नाका, सोलापूर) तरुण गंभीर जखमी झाला होता. आज गुरुवारी सकाळी उपचारादरम्यान



कादर हांडेचा मृत्यू झाला आहे. स्वरुप कोथींबीरे (वय २७, जुनी मिल चाळ, सोलापूर) आणि अमित राजेश जाधव (वय ३०, रा. पांडुरंग वस्ती, शास्त्री नगर, सोलापूर) हे दोघे किरकोळ जखमी झाले आहेत. सोलापूर-हैदराबाद महामार्गावर झालेला अपघात इतका भीषण होता की, कार सुमारे दीडशे फूट फरफटत गेली. कारचे संपूर्ण छत कापून बाजूला निघून पडले आहे.कारमधील पाच मित्र पुणे रोडवरील ढाब्यावर जेवणासाठी गेले होते. जेवण आटोपून ते मध्यरात्री परत निघाले होते. डी-मार्टच्या पुढे पर्ल गार्डनच्या समोर हायवेवर ट्रक उभा होता. वळणावर कारचालकाला तो दिसला नाही. त्यामुळे ही कार ट्रकवर पाठीमागून धडकली.अपघाताची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. शेखर सुरेकर आणि अमोल येरटे या दोघांचा जागीच मृत्यू झाला होता.

# खंडाळी ग्रामस्थांच्या वतीने संघर्ष योद्धा मनोज जरांगे -पाटील यांचा सत्कार



**शिव निर्णय**/खंडाळी : मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे- पाटील यांचे खंडाळी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार मराठा सेवक व बहुजन समाज सामाजिक कार्यकर्ते रणजितसिंह कदम-पाटील यांनी सत्कार केला. मनोज दादा जरांगे-पाटील सातारा दौऱ्यावरून परतत असताना मराठा आरक्षण लढ्यात पहिल्यापासून कार्यरत असणारे, मनोज दादांचे निष्ठावंत सेवक रणजितसिंह कदम -पाटील यांनी आमच्या गावावरून जाताना आमच्या घरी चहा पान घेऊन जावंच लागतंय असा आग्रह केला. रणजितसिंह कदम मराठा आरक्षण लढ्यात अंतरवली सराटीला कधी ट्रकने, कधी टू व्हिलरवर अनेक वेळा गेले. आरक्षण लढ्यात कित्येक दिवस अंतरवली सराटीत मुक्काम केला,

मराठा आरक्षणात हिरारीने सहभाग घेत मनोजदादांचे विश्वासू सहकारी बनले. दौऱ्यात रणजितसिंह कदम यांच्या आग्रहा खातर मनोज दादांनी गाड्यांचा ताफा खंडाळीकडे वळवत आपल्या कार्यकर्त्याचा सन्मान केला यावेळी कदम -पाटील यांच्या निवासस्थानी त्यांचा सत्कार घेऊन मनोज दादा मार्गस्थ झाले.यावेळी गावातील विविध संस्थाचे पदाधिकारी, व मराठा सेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

ऐका निष्ठावंत कार्यकर्त्याचा सुद्धा मनोज दादानी आत्मीयतेने विचार केला याची चर्चा गावात सर्वत्र होताना दिसत होती.

# शंकर सेठ साबळे नेत्र रुग्णालय सोलापूर येथे ६५१० रुग्णांना मिळाली नवसंजीवनी

**शिव निर्णय**/सोलापूर, अंधजन मंडळाचे, शंकर सेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर, प्रकल्प एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय, यांनी नेत्रसेवेच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून रुग्णालयात आतापर्यंत ६५१० यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत.

सोलापूर जिल्ह्यासह लातूर, धाराशिव आणि आसपासच्या ग्रामीण भागातील हजारो गरजू रुग्णांना या सेवांचा लाभ मिळत आहे. लहान गावांमधून येणारे शेतकरी, कामगार, मजूर तसेच विविध आर्थिक परिस्थितीतील रुग्णांवर अत्याधुनिक सुविधांद्वारे डोळ्यांचे उपचार करण्यात आले आहेत. रुग्णालयामध्ये सर्व प्रकारच्या नेत्ररोगांवर उपचार उपलब्ध असून सर्वसामान्य नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात उत्कृष्ट सेवा दिली जाते.

रुग्णालयात आधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, उच्च दर्जाची नेत्र तपासणी सुविधा तसेच अनुभवी व उच्चशिक्षित डॉक्टरांची टीम कार्यरत आहे. रुग्णांच्या सोयीसाठी सर्वसमावेशक नेत्र तपासणी व गुणवत्तापूर्ण उपचार सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

यावेळी असोसिएट डायरेक्टर सुधीर सुधाळ यांनी




नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, ''डोळ्यांच्या कोणत्याही समस्येकडे दुर्लक्ष करू नका.शंकर सेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर येथे आधुनिक तंत्रज्ञानासह विश्वासार्ह व परवडणाऱ्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. अधिकाधिक नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा. मोतीबिंदू मुक्त गाव करण्यासाठी अभियान राबविण्यात येत आहे. त्यासाठी लागणारी संपूर्ण यंत्रणा उपलब्ध असून ग्रामपंचायत, विविध सामाजिक संस्था यांनी सहकार्य करावे.''रुग्णालय समाजातील प्रत्येक घटकापर्यंत उत्तम नेत्रसेवा पोहोचवण्यासाठी कटिबद्ध असून भविष्यातही ग्रामीण भागातील गरजू रुग्णांसाठी सेवा कार्य अधिक व्यापक करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

# रिजवान शेख यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान




**शिव निर्णय**/सोलापूर : येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे एकनाथ स्वाभिमान शिक्षक सेना, महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने मित्रप्रेमचे कार्यकारी संपादक रिजवान शेख यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा.डॉ. बापूसाहेब अडसूळ यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यासाठी राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू सहकारी व उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास शिवसेना प्रवक्ते व नवी मुंबईचे नगरसेवक अंकुश कदम यांच्या अध्यक्षतेखाली माजी गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे, जिल्हाप्रमुख शिवसेना सोलापूर मनीष काळजे, उपशिक्षणाधिकारी (जि.प. सोलापूर) प्रकाश नांगरे, वेतन अधीक्षक लक्ष्मण बालवाड, तसेच जिल्हाप्रमुख शिवसेना महेश चिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# टेंभुर्णी केंद्रामध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल ज्ञानेश्वरी देशमुख हिचा सन्मान

**शिव निर्णय**/.टेंभुर्णी : टेंभुर्णीतील देशमुख परिवारातील ज्ञानेश्वरी विश्वास देशमुख हिने १२ वी टेंभुर्णी केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या उज्ज्वल कामगिरीबद्दल शिवतेज प्रतिष्ठानच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला सोलापूर जिल्हा शरद चंद्र पवार पक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष. सुरज देशमुख व उपस्थित मित्रपरिवार यांच्या शुभहस्ते ज्ञानेश्वरीचा सत्कार करून तिचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या वेळी सुरज देशमुख यांनी शिवतेज



प्रतिष्ठानतर्फे आयोजित केलेल्या सत्कार समारंभाचे कौतुक करत सर्व पदाधिकारी व सदस्यांचे अभिनंदन केले.

या सत्कार समारंभास उपस्थित टेंभुर्णीशहराचे समाजिक क्रार्यकर्त गोरखबप्पा देशमुख ,प्रतापराव भागवत देशमुख, अर्जुन जनार्दन देशमुख, बाळासाहेब बारवे, नितीन देशमुख, जयसिंग देशमुख, सोमनाथ देशमुख ,सतीश देशमुख, संजय देशमुख, धनंजय देशमुख, विश्वास देशमुख ,विवेकांत देशमुख, गणेश काळे, प्रकाश कन्हेरे ,दादासाहेब देशमुख, अविनाश देशमुख, समाधान देशमुख, नागेश देशमुख, किरण देशमुख, बालू देशमुख ,संतोष देशमुख, आप्पा जाधव, तात्या जाधव ,अथर्व देशमुख, श्रीमंतराजे देशमुख, विकास देशमुख ,उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश देशमुख यांनी केले.

# अकलूज येथे ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने ११ बटुंवर उपनयन संस्कार



**शिव निर्णय**/अकलूज : अकलूज येथील ब्राह्मण सेवा संघ व श्री गणपती मंदिर ट्रस्ट यांचे वतीने आयोजित सामुदायिक व्रतबंध सोहळ्यामध्ये ११ बटुंवर उपनयन संस्कार करण्यात आले. या कार्यक्रमात बटुंना शुभाशीर्वाद देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंहजी मोहिते पाटील, जयसिंह मोहितेपाटील, किशोरसिंह माने पाटील, सौ. शीतलदेवी मोहितेपाटील, शिवतेजसिंह मोहितेपाटील, धनंजयभाऊ देशमुख,अभय इनामदार व अकलूजमधील नगरसेवक व मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याचे पौरोहित्य दिपक शास्त्री कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली हरिकाका कुलकर्णी, अवधूत शेकदार,प्रवीण इनामदार, श्रीराम महाजन,गणेश कुलकर्णी, निलेश कुलकर्णी यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्राह्मण सेवा संघ व श्री गणपती मंदिर ट्रस्टच्या सर्व पदाधिकारी व समाज बधू व भगिनींनी विशेष परिश्रम घेतले.

# रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना निरोप

**शिव निर्णय**/वेळापूर : शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संलग्नित रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित महाविद्यालयांमध्ये विद्यार्थिनी व विद्यार्थी बीएससी अॅग्री या पदवीचा चार वर्षाचा चार वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. या अभ्यासक्रमाअंतर्गत कृषी कार्यानुभव सन २०२५-२६ अंतर्गत चा अभ्यासक्रम वेळापूर तालुका माळशिरस येथे पार पडला. सदर रावे अभ्यासक्रमाच्या वेळी प्रगतशील शेतकरी व वेळापूर सोसायटीचे व्हाईस चेअरमन महादेव ताटे यांनी अभ्यासक्रमातील कृषी कन्यांना मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. या चार वर्षाचा अभ्यास पूर्ण झाल्यावर सदर कृषी कन्यांनी महादेवभाऊ ताटे यांच्या निवासस्थानी भेट दिली आसता ताटे कुटुंबीयांकडून कृषी कन्यांना निरोप देत असताना कृषी देवता भगवान बळीरामाची प्रतिमा, देऊन कृषी कन्या आरती मंडले, योगेश्वरी मदने, मोहिनी कानडे, वैष्णवी हिवरकर, अनुपमा गोसावी, अनघा फरांदे, राजनंदनी डिकोळे, प्राजक्ता जाधव, सिद्धी पाटील यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना कृषी कन्या आरती मंडले म्हणाली की वेळापूर येथे अभ्यासक्रम पूर्ण करत असताना सर्वकृषी कन्यांना महादेवभाऊ ताटे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, महादेव जाधव, मेस वाले पिसेकाका, डेअरी चेअरमन माऊली जानकर, भाकरे काका, चंदू चंदनशिवे, रमेश बनकर हे सर्व व सर्व शेतकरी वर्ग या सर्वांनी आम्हाला मोलाचे सहकार्य केले असे सांगितले.

# करमाळा शहरात मूलभूत सुविधांचा बोजवारा; रस्ते, पाणी आणि स्वच्छतेच्या प्रश्नांनी नागरिक हैराण

**शिव निर्णय**/करमाळा : करमाळा शहराचा विस्तार झपाट्याने होत असला तरी, त्या तुलनेत शहरवासीयांना मिळणाऱ्या मूलभूत सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. खराब रस्ते, अनियमित पाणीपुरवठा आणि ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग यामुळे करमाळाकरांचे जगणे मुश्किल झाले आहे नगर परिषद प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. शहरातील मुख्य बाजारपेठ असो वा अंतर्गत गल्लीबोळ, सर्वच ठिकाणच्या रस्त्यांची चाळण झाली आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांवर मोठे खड्डे पडले असून पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांचे रस्त्यावरील खड्ड्यांमुळे छोटे-मोठे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या रस्ते दुरुस्तीच्याकामांकडे प्रशासनाने पाठ फिरवल्याचे चित्र आहे.

शहरातील काही भागात पिण्याचे पाणी नियमित मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. तीन तीन दिवस पाणी येत नसल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. पाण्याची पाईपलाईन जुनी झाल्याने अनेक ठिकाणी गळती होत आहे, ज्यामुळे शुद्ध पाणी मिळण्याऐवजी दूषित पाणी पुरवठा होत असल्याची भीती नागरिकांमध्ये आहे.

'स्वच्छ भारत' अभियानाच्या वल्गना केल्या जात असल्या तरी करमाळा शहरात मात्र ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले पाहायला मिळत आहेत. कचरा उठाव करणारी घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिक उघड्यावर कचरा टाकत आहेत. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचे प्रमाण वाढल्याने आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही नगर परिषद प्रशासनाकडून केवळ निधी नसल्याचे किंवा तांत्रिक अडचणीचे कारण पुढे केले जात आहे. करमाळा शहराच्या विकासासाठी आलेला निधी नक्की जातो कुठे? असा सवाल आता सामान्य जनता विचारत आहे.

# कल्याणमध्ये वादळी वाऱ्याचं थैमान

**शिव निर्णय/ठाणे :** निसर्गामध्ये अचानक झालेल्या बदलांमुळे दिवा, डोंबिवली, कल्याण, मलंगगड परिसर आणि ग्रामीण भागात चारच्या सुमारस धुळीचे वादळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरावर पसरलेल्या या धुळीमुळे शहरातील हवेची गुणवत्ता ही मोठ्या प्रमाणात खालावल्याचं बोललं जात आहे. असेच धुळीचे वादळ मागच्या आणि त्याच्या मागच्या वर्षी सुद्धा आलं होतं. उन्हाळ्यात असे वादळ येत असून हे तिसरं वर्ष आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात ढगाळ वातावरण तसेच अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्यातर्फे वर्तवण्यात आला होता. सद्या परिस्थिती पाहता हे सर्व खरं होताना दिसत आहे. राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी लागली असून कल्याण, डोंबिवली, दिवा आणि आसपासच्या ग्रामीण परिसरात आज सकाळपासूनच वातावरणात उकाडा होता.

# पंढरपुरात बुद्धभूमी व विपस्सना केंद्रासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जिल्हाधिकारी यांना कार्यवाहीचे आदेश

**शिव निर्णय**/पंढरपूर :मागील काही वर्षापासून पंढरपूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बुद्ध विहार व विपश्यना केंद्र व्हावे. यासाठी विविध सामाजिक संघटनांकडून मागणी करण्यात आली होती. याची दखल घेऊन पंढरपूर नगरपरिषदेने यमाई तलाव शेजारी प्रस्तावित जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे बुद्ध विहार उभारण्याबाबतचा ठराव संमत करण्यात आला होता. यासाठी वेळोवेळी प्रस्तावित बुद्धभूमी कृती समितीने पाठपुरावा केला होता. मात्र सदर बुद्ध विहाराच्या जागेबाबत जिल्हास्तरावरील शासकीय यंत्रणेमध्ये उदासीनता दिसून आल्याने बुद्धभूमी कृती समितीला आंदोलनाचा पवित्र घ्यावा लागला होता. याबाबत आ.राजू खरे, रिपाइं नेते दिपक चंदनशिवे यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना कार्यवाहीचे आदेश दिल्याने आ. राजू खरे, यांच्या पाठपुराव्यामुळे बुद्ध विहार उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पंढरपूर नगरपरिषद हद्दीतील यमाई तलावानजीक शासन मालकीची १० एकर जमिनीवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे बुद्धविहार, विपस्सना केंद्र मंजुरी बाबत पंढरपूर नगरपरिषदेने जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे प्रस्ताव दि.१७ मार्च २०२६ रोजी भुमी अभिलेख कार्यालयामार्फत हद्द खुणा कायम करुन नकाशासह सादर केला आहे. परंतु त्याचा सात बारा उतारा तयार होणेकामी गेली १४ वर्ष नगरपरिषद प्रस्तावित बुद्धभूमी कृती समीतीने वेळोवेळी आंदोलने करुनही



अद्याप त्यास मंजुरी मिळालेली नाही. ही सर्व माहिती जाणुन घेऊन नगरविकास व गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना कार्यवाहीचे आदेश दिले.

याप्रसंगी आमदार राजू खरे, दिपक चंदनशिवे, महेश मोटे, योगेश जाधव, अमित कसबे, लाकियत मुलाणी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वाती चव्हाण महाराष्ट्र राज्य ग्रामरत्न सरपंच पुरस्काराने सन्मानित

**शिव निर्णय**/टेंभुर्णी : माढा तालुक्यातील चव्हाणवाडी (टे) च्या सरपंच सौ स्वाती हनुमंत चव्हाण यांना अखिल भारतीय सरपंच परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पाचगणी महाबळेश्वर येथे महाराष्ट्र राज्य ग्रामरत्न सरपंच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

अखिल भारतीय सरपंच परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने यावर्षीचा दिला जाणारा आजी माजी सरपंच उपसरपंच पुरस्कार चव्हाणवाडी गावच्या विद्यमान सरपंच सौ स्वाती हनुमंत चव्हाण यांना महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष हुकुमचंद आमदेरा, शिवव्याख्याते संभाजी मोहिते, महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेचे अध्यक्ष जयंत पाटील व माजी उपसभापती




माढा पंचायत समिती सौ प्रसिद्धी जयंत पाटील या मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार स्वीकारताना सरपंच प्रतिनिधी हनुमंत चव्हाण, अँड सचिन चव्हाण, माजी सरपंच नवनाथ शिंदे, ग्रामपंचायत सदस्य सुभाष इंदलकर पाटील तांबवे गावचे सरपंच नागेश खटके,यांच्या उपस्थितीमध्ये महाबळेश्वर पाचगणी या निसर्गरम्य ठिकाणी या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सरपंच सौ चव्हाण यांनी आपल्या काळामध्ये केलेल्या विकास कामाची दखल घेत हा पुरस्कार त्यांना देण्यात आला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल चव्हाणवाडी व परिसरामध्ये सरपंच स्वाती चव्हाण यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

शिव निर्णय हे दैनिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, मुद्रक अनिल शंकरराव शिराळकर यांनी महाराष्ट्र इंटरप्राईझेस ब्लॉक नं. ९, बिल्डींग नं. ४, मंत्रीचंडक विहार, हॉटेल बालाजी सरोवर समोर, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर. पिन-४१३००४ , (महाराष्ट्र) येथे छापून ब्लॉक नं. ९, बिल्डींग नं. ४, मंत्रीचंडक विहार, हॉटेल बालाजी सरोवर समोर, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर. पिन-४१३००४ (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले. **संपादक अनिल शंकरराव शिराळकर** मो ९९२३४५६७९६ RNI No.-MAHMAR/2020/79125

OWNED, PRINTED AND PUBLISHED BY ANIL SHANKARRAO SHIRALKAR , Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) PRINTED AT MAHARASHTRA ENTERPRISES Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) Published at Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) EDITOR : ANIL SHANKARRAO SHIRALKAR MO-9923456796, RNI No.-MAHMAR/2020/79125

# खून आणि चोरी तसेच फिर्यादीला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपी संदीप गुप्ता हयास जन्मठेप

## पनवेल-जिल्हा व सत्र न्यायाधीश माननीय उगले साहेब यांच्या कोर्टाचा सनसनाटी निकाल

पनवेल : दिनांक ०७/०५/२०२६ रोजी मा. उगले साहेब सत्र न्यायालय पनवेल हयांनी इ.पि.को. कलम ३०२,३०७,३९४,३९७ अन्वये आरोपी संदीप गुप्ता रा. उल्वे हयास जन्मठेप व ५०,००० रूपये दंडाची शिक्षा ठोकावली.

गुन्हयाची हकीकत राम प्रसाद गुप्ता आणि त्यांची पत्नी लक्ष्मी देवी, उलवे येथील फलॅटवर दोघेच राहात होते. त्यांची तिन्ही मुले व एक मुलगी इतरत्र राहत होते. संदीप गुप्ता हा मयत रामप्रसाद हयांचा मुलगा सतीश हयाचा मेव्हणा आहे. त्याने रामप्रसाद यांच्याकडून ७०,००० रू. उसने घेतले होते. सदरची रक्कम रामप्रसाद हे आरोपी संदीप कडे मागत होते. त्या रागातून चोरीच्या व खूनाच्या इरादयाने दिनांक २२/०४/२०२६ रोजी आरोपी संदीप हा रामप्रसाद यांच्या घरी आला. घरी रामप्रसाद व पत्नी दोघेच होते. लक्ष्मीदेवी घरात चहा बनवण्यासाठी गेले असता आरोपी संदीप हयांने रामप्रसाद हयास बेडरूममधे नेऊन चाकूने वार करून खून केला. पत्नी बेडरूममधे पाहण्यासाठी गेली असता आरोपीने तीच्याही गळ्यावर वार करून तिला बाथरूमधे आपटली त्यानंतर कपाटातून नऊ तोळे दागिने व ८०,००० रूपये चोरून आरोपीने पोबारा केला. जखमी लक्ष्मीदेवी कशीबशी इमारती खाली येऊन तिने एका साक्षीदारा सामक्ष इंग्रजी पेपरवर सतीश के साले ने मेरे पती को मारा असे लिहून ठेवले त्यानंतर तिला दवाखान्यात उपचारासाठी नेले दोन साक्षीदारांचा सतर्कतेने तिला ताबडतोब उपचार मिळाले व तिचे प्राण वाचले. तिची साक्ष हया खटल्यात महत्वाची ठरली. सदर गंभीर गुन्हा एन.आर.आय पोलीस ठाण्यात दाखल होउन पुढील तपास पोलीस उपाध्याक्ष स्मिता जाधव यांनी केला होता. पनवेल सेशन कोर्टात सरकारी वकील वाय. एस. भोपी यांनी हा खटला लढवला. सुनावणी दोन वर्ष चालली. १६ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी वकीलांचा जोरदार युक्तीवाद मान्य करून कोर्टाने आरोपीस ई.पी. को कलम ३०२, ३०७, ३९४, ३९७ खाली जन्मठेप व दोन वेळा ७-७ वर्ष सश्रम कारावास व ५०,००० रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली. दंडाची रक्कम व दागिने, रूपये ८०,००० फिर्यादी लक्ष्मीदेवी हिला देण्याचेही आदेश केले. सदर केसचे कामी पोलीस वाघचौरे, पोलीस गिरासे व आताच्या डी. वाय. एस.पी. स्मिता जाधव व साक्षीदारांचे मोलाचे सहाय्य लाभले. निराधार व वृध्द इसमांच्या अगतीकपणाचा व एकटेपणाचा गैरफायदा घेऊन खून व चोरी करणा-या प्रवृत्तीला जन्मठेप मिळाल्याने मिळाल्याने सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांचा राजीनामा



कर्जत : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे सुपूर्द केला. पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांच्या जवळचे म्हणून ओळखले जाणारे जितेंद्र पाटील यांनी जिल्हा अध्यक्ष पदावर दहा वर्षे काम केले. नवीन चेहऱ्यांना संधी देण्यासाठी जितेंद्र पाटील यांनी राजीनामा दिला असून पक्षाच्या रेल्वे संघटनेचे अध्यक्ष म्हणून पूर्वीपासून जितेंद्र पाटील यांच्याकडे जबाबदारी आहे.

२०१६ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी मनसेचे रेल्वे युनिट मध्ये सरचिटणीस पदावर काम करणारे जितेंद्र पाटील हे मनसेचे गोटामधील जवळचे कार्यकर्ते समजले जात होते. रायगड जिल्ह्यातील संघटन चांगले असल्याने ते अधिक मजबूत करण्यासाठी जितेंद्र पाटील यांच्याकडे जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आली. प्रामुख्याने मराठी तरुणांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी जितेंद्र पाटील यांची धावपळ सुरू असायची. जे एस डब्लू मध्ये मराठी तरुणांच्या न्याय हक्कासाठी आवाज उठवणारे जितेंद्र पाटील तरुणांचे हक्काचे समजले जातात. पक्षाच्या माध्यमातून महिलांना शिवणकला मशीन भेट देण्याचे कार्य तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना संगणक भेट देणे अशी विविध कामे त्यांच्या माध्यमातून मनसेचे वतीने झाली आहेत.जिल्हात अनेक आंदोलने करून प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचा पुढाकार घेतला होता. संघटनेच्या माध्यमातून नुकताच पक्षाचा वर्धापन दिन सोहळा किल्ले रायगडाच्या पायथ्याशी साजरा करून पक्षबांधणी आणि सभासद नोंदणीचा शुभारंभ पक्ष अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केला होता.

मनसेचे रायगड चषक क्रिकेट स्पर्धेचे निमित्ताने रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना गेली चार वर्षे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहेत. या स्पर्धेचे निमित्ताने पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे तसेच युवानेते अमित ठाकरे यांनी भेट दिली होती. असे हे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन राजीनामा सुपूर्द केला. पाटील मनसेचे रेल्वे युनिटचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

### सावत्र पित्याच्या अत्याचाराने करंजाडे हादरले

पनवेल: पनवेलमधील करंजाडे नोड परिसरात सावत्र पित्याकडून अल्पवयीन मुलीवर गेल्या दोन वर्षांपासून अत्याचार सुरू असल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पीडित मुलीच्या आईने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला असून, आरोपीविरोधात कठोर कारवाई करण्याची तयारी पोलिसांनी सुरू केली आहे.

पीडित मुलगी अवघी १५ वर्षांची असून, आरोपी हा तिचा सावत्र पिता असल्याची माहिती पोलिसांनी दिली. सुरुवातीला पित्याच्या नात्याचा आधार घेत आरोपीने मुलीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर घरात आई नसताना तिच्यावर वारंवार अत्याचार करण्यात आले. भीतीपोटी मुलगी दीर्घकाळ गप्प राहिली होती. काही कारणांमुळे आरोपी आईपासून दूर गेल्यानंतर पीडित मुलीने धाडस करून आईसमोर आपल्यावर होत असलेल्या अत्याचाराची माहिती दिली. मुलीकडून सारा प्रकार समजताच आईने तातडीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. या प्रकरणातील आरोपीवर यापूर्वीही इतर गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर हे या प्रकरणात अधिक तपास करीत आहेत. आरोपीला लवकरच अटक करण्यात येणार असल्याचे पोलीस म्हणाले.

# भूखंडाचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची ५७ लाखांची फसवणूक

### उरण मध्ये फसवणूक करून जमीन विक्री करणारी बनावट टोळी सक्रिय

उरण : उरण तालुक्यातील मोकळे भूखंड विकत देण्याचे आमिष दाखवून एका टोळीने १५ गुंतवणूकदारांकडून तब्बल ५७ लाख ३६ हजार रुपये उकळले आहे . त्यांना प्लॉट अथवा त्यांची रक्कम परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सीबीडी बेलापूर पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी तेजस डाकी व त्याच्या इतर साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणातील टोळीने जून २०२२ मध्ये सीबीडी परिसरात मे. लँडलॉर्डस् रिअलटर्स या कंपनीचे कार्यालय सुरू केले होते. त्यानंतर त्यांनी उरण तालुक्यांतील विंधणे , वशेणी व पुनाडे या भागातील मोकळे प्लॉट विकत देण्याची जाहिरातबाजी केली होती. या जाहिरातबाजीला भुलून अनेक गुंतवणूकदारांनी या कंपनीकडे धाव घेतली. आरोपींनी या गुंतवणूकदारांकडून प्लॉटच्या मोबदल्यात मोठी रक्कम घेतली. मात्र, पैसे घेऊनही आरोपींनी प्लॉटचा दिला नाही आणि गुंतवणूकदारांचे पैसेही परत केले नाहीत.त्यामुळे गुंतवणूकदारांची मोठया प्रमाणात फसवणूक झाली.

या प्रकरणात फसवणूक झालेल्यांमध्ये पुष्करसिंग रावत याच्यासह प्रवीण चंदनशिव, प्रदीप भाटकर, सुनील वाडकर, कांतीलाल पटेल, गौरव वरसोलकर, राजिंदर सिंग, हफिज अन्सारी, मनोज होळकर, नानी मंडल, तुकाराम ढेपे, सचिन शहाणे, सुनील शेट्टी व इतरांचा समावेश आहे. या सर्वांना मिळून ५७लाख ३६ हजार रुपयांचा गंडा घालण्यात आला असून या १५ गुंतवणूकदारांनी एकत्र येऊन सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.आर्थिक फसवणूक करून खोट्या जमीन खरेदी विक्री करणाऱ्या टोळ्या उरण तालुक्यात सक्रिय झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# संग्राम तोगरे आदिवासी वाडीला आनंद देणारा एक मोठ्या मनाचा माणूस : साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील

उरण : समाज सेवेचे व्रत अंगी घेतलेले कवी संग्राम तोगरे हे मागील कित्येक वर्षांपासून विविध ठिकाणच्या डॉक्टरांकडे शिल्लक राहिलेली आणि गरीब पेशंटना उपयुक्त ठरणारी औषधे गोळा करून योग्य जागी पोहोचविण्यात तोगरे सतत सेवा करीत राहिले आहेत.ते सेवेचे व्रत करतांना त्यांनी काही दात्यांकडून धान्य,डाळ,कपडे गोळा करून गरजूंना दिले आहे. यावेळी आपल्या ७९ व्या वाढदिवशी तेली पाडा ( मुळेखंड ) येथील नव्या आदिवासी वस्तीवर जाऊन ४० घरकुलांना वरील वस्तूंचे वाटप केले , त्यामुळे वाडीला आनंद देणारा एक माणूस आहेत असा विचार साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांनी वाटप प्रसंगी उपस्थितांसमोर मांडला.

दाते चंद्रकांत ठक्कर यांनी ही संग्राम यांचे विषयी गौरवोद्गार काढून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी समाजसेवेत मदत करणा-या संग्राम यांच्या पत्नी सौ. सुमन तोगरे,कार्यकर्ते रवी काटे (केगांव ), नक्षत्रा संग्राम,उमाजी लक्ष्मण पवार इत्यादी प्रमुखांची उपस्थिती होती. वाडीवरच्या तेथील उपस्थितांनीसंग्राम तोगरे दांपत्याला भरभरून सदिच्छा दिल्या.



### सुखीबाई ओसवाल यांचे निधन



कर्जत - कर्जत शहरातील महावीर पेठ मध्ये राहणाऱ्या सुखीबाई धनराज ओसवाल यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक कन्या, सूना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

## पावसाच्या शिडकाव्याने कर्जतकरांना उकड्या पासून दिलासा

कर्जत - गेल्या चार - पाच दिवसापासून तापमानात वाढ होत असल्याने उकड्याने हैराण झालेल्या कर्जतकारांना आज दुपारी तीनच्या सुमारास पडलेल्या पावसाने दिलासा दिला. हवेत गारवा आल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

गेल्या आठवड्यापासून तापमातात लक्षणीय वाढ झाल्याने दिवस व रात्र नागरिक उकडयाने हैराण झाले होते. त्यातच ऐन झोपेच्या वेळी काल रात्री अकरा पासून ते पहाटे चार वाजेपर्यंत विज पुरवठा खंडित झाल्याने कर्जतकरांच्या झोपेचे खोबरे झाले होते. आज सकाळपासून उकड्यामुळे सर्वजण हैराण झाले होते. दुपारी तर अंगाची लाही - लाही होत होती. मात्र तीनच्या सुमारास पावसाने सुरुवात केली. त्यातच वाराही सुटला. त्यामुळे उकड्याने हैराण झालेल्या कर्जतकारांना थोडासा दिलासा मिळाला. हा पाऊस सुमारे पाऊण तास पडत होता. वारा सुटल्याने विज पुरवठा खंडित करण्यात आला होता. तरीही थोड्याशा गरव्याने दिलासा मिळाला.

लग्नाची तिथ असल्याने विवाह सोहळा असलेल्या कुटुंबाच्या तोंडचे पाणी पळाले होते. मात्र पाऊस थांबल्याने गोरज मुहूर्तावर असलेले विवाह सुरळीत पार पडले.

## सव्वाचौदा लाखांचे दागिने पनवेलमधील घरफोडीत लंपास

पनवेल : घरात शिरून चोरट्याने सुमारे १४ लाख २५ हजारांचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाणे येथे ५ मे रोजी गुन्हा दाखल केला आहे.

पनवेलच्या देवदगाव येथील अनमोल रेसिडेन्सीमध्ये राहणारे अक्षय प्रताप पाटील यांच्या घरात दरवाजातून प्रवेश करून ही चोरी झाली. घरातील कपाट उघडून सोन्याचे गंठण, राणीहार, अंगठ्चा असा सुमारे १४ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला.

# नवी मुंबई मध्ये ग्लोबल बिझनेस समिटचे आयोजन; यू बिझनेस मिट यांचा अनोखा उपक्रम

पनवेल : नवी मुंबई मधील प्रथमच ग्लोबल बिझनेस समिट चे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि थायलंड यांच्यामधील व्यापार वृद्धीच्या अनुषंगाने हे समिट अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बेलापूर येथील पार्क या तारांकित हॉटेल मध्ये १८ मे रोजी ही समिट संपन्न होणार आहे.



थायलंडचे माजी उपपंतप्रधान एच इ कॉर्न दब्बरान्सी, इंजीनियरिंग इन्स्टिट्यूट ऑफ थायलंडचे संचालक तथा चे सल्लागार प्रो. डॉ. चियांचुंग ओदिकलायांनामित्र, भारतातील थाई दुधावासाचे माजी सदस्य तथा चे सल्लागार थाराडोल थाँगग्रंग, पंतप्रधान कार्यालयातील फॉरेन अफेयर्स सचिव प्रसर्त पियासाचादेश यांचे शिष्टमंडळ या बिझनेस सबमिटमध्ये थायलंड देशाच्या वतीने उपस्थित राहणार आहे. तूर्तास युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांतील व्यापार वृद्धी हा विषय संपुष्टात आलेला आहे. होर्मुज समुद्रधुनी रोखून ठेवल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर त्याचे अत्यंत विपरीत परिणाम दिसून येत आहेत. युनायटेड नेशन्स सोबत महत्त्वपूर्ण बिजनेस ट्रेड डील झालेली असली तरी देखील ती अमलात आणण्यासाठी किती वेळ लागेल याचे कुणाकडे शाश्वत उत्तर नाही. व्यवसायाच्या दृष्टीने महासत्ता असणाऱ्या अमेरिकेला सध्या युद्धाची झळ सोसावी लागत असल्या कारणामुळे भारतीय गुंतवणूकदार व्यवसाय वृद्धी करता या देशाकडे देखील सकारात्मक दृष्टीने पाहत नाहीत. चीन सारखा व्यवसाय वातावरण पोषक देश आपल्या शेजारी असून देखील या देशासोबत असणारी विश्वासार्हता ही नेहमीच वादातीत राहिलेली आहे. याच कारणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये व्यवसाय वृद्धी करण्याकरता भारतातील लघु मध्यम आणि मोठे व्यावसायिक योग्य संधीच्या शोधात आहेत. दुसरीकडे थायलंड सारखा देश हा सातत्याने ऐयाशी करण्याकरता प्रसिद्ध राहिलेला आहे. परंतु या देशातील असणाऱ्या व्यवसाय पोषक परिस्थितीचा भारतातील गुंतवणूकदार आणि व्यावसायिक यांना फायदा होऊ शकतो. याच गोष्टीची चाचपणी करण्याकरता दोन्ही देशांतील व्यावसायिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्याकरता यु बिझनेस मीट यांच्यावतीने ग्लोबल समिट २०२६ चे आयोजन करण्यात आलेले आहे. १८ मे रोजी संपूर्ण दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी व्यवसायाचे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्टॉलचे आयोजन देखील करण्यात आले आहे. या समितीमध्ये सहभागी होण्याकरता सशुल्क नावे नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली असून बुक माय शो च्या माध्यमातून देखील या समितीमध्ये रजिस्ट्रेशन करता येऊ शकेल. रियल इस्टेट, इम्पोर्ट एक्सपोर्ट, बँकिंग, एज्युकेशन, टेक्नॉलॉजी, मेडिकल टुरिझम, लाईफस्टाईल आणि हेल्थकेअर, स्पेशल टुरिझम, स्पिरिचुअल टुरिझम ग्लोबल मीडिया अँड एंटरटेनमेंट या व्यवसाय क्षेत्रांवर प्राधान्य क्रमाने फोकस ठेवण्यात आलेला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर द्विदेशीय व्यवसाय संधी शोधण्याच्या प्रयत्नात यु बिझनेस मीट यांनी थायलंड या देशापासून सुरुवात केलेली असून नजीकच्या भविष्यात अशाच पद्धतीच्या व्यवसाय सुलभ पोषक वातावरण असणाऱ्या देशांसोबत बिझनेस समिट आयोजित करण्याचे मानस आहे.

# उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात मातीची चोरी, प्रशासनाचे दुर्लक्ष,शासनाचे मात्र करोडोनचे नुकसान

उरण : महसूल खात्याचे सर्व अधिकारी गाढ झोपेत असतानाच उरण तालुक्यातील चाणजे, चिर्ले,वेश्वी, दिघोडे , विंधने, चिरनेर, कळंबुसरे,मोठी जुई,कोप्रोली,पिरकोण,सारडे,वशेणी,पुनाडे परिसरातून केवळ दिवसाच नव्हे तर रात्रीच्या वेळी देखील माती उत्खनन करण्याच्या प्रकारांचे पेव फुटले आहे. येथील अनेक ठिकाणी डोंगरांना या कंत्राटदाररुपी घुशी लागल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे ज्या तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या नाका खाली हे भूमाफिया माती उत्खनन करीत आहे, याची सुतराम माहिती देखली या अधिकाऱ्यांना नसल्याने शासनाचे करोडो हुन अधिक नुकसान होत आहे.

जेएनपीए बंदर, नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ,अटल सेतू या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे उरण तालुक्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे २०२१ पासून विकासकांनी, भांडवलदारांनी उरण तालुक्यात विशेष लक्ष केंद्रित केले आहे.उरण तालुक्यात अनेक ठिकाणी सरकारी वनविभाग, गुरचरण, खासगी अशा जमिनीतुन माती माफिया,गाव पुढारी हे बिंधासपणे माती चोरुन विकासकाला विकत आहेत. हे माती माफिया एखाद्या खासगी जागेवर माती काढणीची परवानगी मिळवून हळूहळू बाजूच्या वन जमिनी, सरकारी जमिनी व गुरचरणाच्या जमिनीवरही ताव मारुन माती काढून नेत असतात.त्यामुळे जंगली प्राण्यांची आश्रयस्थाने नष्ट होण्याचा धोका निर्माण होऊन डोंगर बोरके होत आहेत.

एकीकडे माती उत्खननाला बंदी असताना दुसरीकडे मात्र दिवस-रात्र जेसीबी, पोकलेन मशिन चालवला जात आहे. राजरोसपणे डंपरच्या माध्यमातून या मातीची वाहतूक देखील सुरू आहे. मात्र, संबंधित गाव सरपंच व ग्रामसेवक व तलाठी, मंडल अधिकारी व तहसीलदार यांना याकडे लक्ष देण्यास वेळ नाही.उरण तालुक्यातील चाणजे, चिर्ले,वेश्वी, दिघोडे , विंधने, चिरनेर, कळंबुसरे,मोठी जुई,कोप्रोली,पिरकोण,सारडे,वशेणी,पुनाडे इत्यादी भागामध्ये मोठय़ा प्रमाणात माती उत्खनन सुरू असल्याने शासनाची अंदाजे ३०० कोटीहून जास्त नुकसान झाल्याचा आरोप शेतकरी,



आदिवासी नागरिक व्यक्त करत आहे.मात्र तहसीलदारांना या घटनेची माहिती नाही.

तरी उरणचे तहसीलदार डॉ उध्दव कदम यांनी घटनास्थळावर पाहणी करत उत्खनन झालेल्या डोंगर भागाचे मोजमाप मोजणी कार्यालयातर्फे केल्यानंतर नेमकी किती माती चोरी झाली आहे व शासनाचे किती नुकसान झालं आहे हे समजू शकेल.मात्र उरण तालुक्यात कुंपणाने शेत खाण्याचा प्रकार होत असल्याने न्यायाची अपेक्षा करणार तरी काय असा सवाल सध्या शेतकरी, आदिवासी नागरिक व्यक्त करत आहेत.

# कळंबोली येथील 'दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट'मधील एसीच्या कॉपर पाइपची चोरी

पनवेल : कळंबोली परिसरात चोरीच्या घटनांनी पुन्हा डोके वर काढले असून, चोरट्यांनी आता शैक्षणिक संस्थांनाही लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. कळंबोली येथील 'दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट'मधील एसीचे कॉपर पाईप अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास कापून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सेक्टर-५ई, केएल-१ परिसरातील इन्स्टिट्यूटच्या बाहेर बसविण्यात आलेल्या एसी युनिटमधील महागडे तांब्याचे पाईप चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेत चोरी केले. सकाळी इन्स्टिट्यूट चालकाने हा प्रकार लक्षात घेतला.

या घटनेमुळे संस्थेला आर्थिक फटका बसला असून, एसी बंद पडल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासातही अडथळे निर्माण झाले आहेत. दरम्यान, कळंबोली परिसरात गेल्या काही दिवसांत चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वीच एका हळदी समारंभात महिलेचे सुमारे १८ तोळे दागिने हिसकावण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता एसी पाईप चोरीच्या घटनेमुळे व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तांब्याच्या वाढत्या किमतीमुळे अशा प्रकारच्या चोरींना चालना मिळत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिक व व्यावसायिकांनी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांवर लगाम लावावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

# प्रामाणिकपणाचा आदर्श; वाल्मिकी समाजातील अन्नु पारचे यांचा गौरव

पनवेल : प्रभाग क्र. १८ मधील वाल्मिकी नगर येथे राहणाऱ्या व वाल्मिकी समाजातील श्रीमती अन्नु अशोक पारचे यांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हाऊसकीपिंगचे काम करत असताना त्यांना रोख रक्कम व सुमारे २ लाख रुपयांचा चेक सापडला. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तो चेक तात्काळ आपल्या वरिष्ठांकडे सुपूर्द केला.

त्यांच्या या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व मूल्याधिष्ठित वर्तनाची दखल घेत संबंधित संस्थेकडून त्यांना सुपरवायझर पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल पनवेल महापालिकेचे महापौर सन्माननीय श्री. नितीन पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सोबत नगरसेवक श्री. दशरथ म्हात्रे हेही होते. अन्नु पारचे यांच्या या कृतीमुळे वाल्मिकी समाजाची प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि सामाजिक बांधिलकी जपणारी परंपरा अधोरेखित झाली आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



शिव निर्णय हे दैनिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, मुद्रक अनिल शंकरराव शिराळकर यांनी महाराष्ट्र इंटरप्राईझेस ब्लॉक नं. ९, बिल्डींग नं. ४, मंत्रीचंडक विहार, हॉटेल बालाजी सरोवर समोर, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर. पिन-४१३००४ , (महाराष्ट्र) येथे छापून घर नं. २३८, पोलिस चेक पोस्ट जवळ, चरी रोड, पेजारी, ता. अलिबाग, जि. रायगड , पिन- (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले.**संपादक रेखा बब्रुवान जाधव** मो ८९७५६७९७९७ ई मेल-E mail - raigad.shiv.nirnay@gmail.com. RNI N0 - MAHMAR/2021/83274

OWNED, PRINTED AND PUBLISHED BY ANIL SHANKARRAO SHIRALKAR , Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) PRINTED AT MAHARASHTRA ENTERPRISES Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) Published at H.No.238 Near Police Check Post, Chari Road, Pejari, Tal. Aalibag, Dist. Raigad (MAH) EDITOR : REKHA BABRUVAN JADHAV mobile - 8975679797 E mail - raigad.shiv.nirnay@gmail.com. RNI N0 - MAHMAR/2021/83274

# मानवतेची अखंड ज्योत : जागतिक रेड क्रॉस दिन

मानवजातीच्या इतिहासात युद्धे, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, दुष्काळ आणि विविध संकटांनी नेहमीच माणसाच्या अस्तित्वासमोर मोठे प्रश्न उभे केले आहेत. अशा संकटांच्या काळात मानवतेच्या रक्षणासाठी काही संस्था आणि व्यक्ती देवदूतासारख्या धावून येतात. जगभरात दुःख, वेदना आणि संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणाऱ्या अशाच महान चळवळीचे नाव म्हणजे रेड क्रॉस होय. दरवर्षी ८ मे हा दिवस 'जागतिक रेड क्रॉस दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानवतेची सेवा, सहानुभूती, करुणा आणि निःस्वार्थ वृत्ती यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक हेन्री ड्युनाँ यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक, सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानवतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या रेड क्रॉस चळवळीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १८५९ साली इटलीतील सोल्फेरिनो येथे फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यात भीषण युद्ध झाले. या युद्धात हजारो सैनिक जखमी झाले होते. युद्धभूमीवर जखमी सैनिक वेदनेने तडफडत होते, परंतु त्यांच्यासाठी पुरेशी वैद्यकीय मदत उपलब्ध नव्हती. त्या वेळी स्वित्झर्लंडचे व्यापारी आणि समाजसेवक हेन्री ड्युनाँ तेथे उपस्थित होते. त्यांनी ही भीषण परिस्थिती पाहिली आणि त्यांचे मन व्यथित झाले. त्यांनी स्थानिक लोकांना एकत्र करून जखमी सैनिकांना मदत करण्यास सुरुवात केली. 'टुट्टी फ्रेटेली' म्हणजे 'आपण सर्व भाऊ आहोत' हा संदेश देत त्यांनी मानवतेची एक नवीन दिशा जगासमोर ठेवली.

या अनुभवातून प्रेरित होऊन हेन्री ड्युनाँ यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फेरिनो' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांनी युद्धातील अमानुष परिस्थितीचे वर्णन केले आणि युद्धग्रस्तांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी मदतसंस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्यांच्या या विचारांना जगभरातून प्रतिसाद मिळाला आणि १८६३ साली आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना झाली. पुढे १८६४ मध्ये जिनिव्हा करार झाला आणि युद्धातील जखमी सैनिकांच्या संरक्षणासाठी काही आंतरराष्ट्रीय नियम निश्चित करण्यात आले. याच क्षणापासून रेड क्रॉस चळवळीचा जागतिक प्रवास सुरू झाला.

रेड क्रॉस चळवळीची सात मूलभूत तत्त्वे ही तिच्या कार्याची खरी ओळख आहेत. मानवता, निष्पक्षता, तटस्थता, स्वातंत्र्य, स्वयंसेवा, एकता आणि सार्वत्रिकता ही तत्त्वे केवळ शब्द नसून मानवतेच्या सेवेसाठी जगणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या कार्याचे अधिष्ठान आहेत. मानवता हे तत्त्व सर्वांत महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत माणसाचे दुःख कमी करणे आणि त्याचे जीवन सुरक्षित ठेवणे हे रेड क्रॉसचे प्रमुख उद्दिष्ट आहे. निष्पक्षता म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ण किंवा राजकीय विचार न पाहता सर्वांना समान मदत करणे. तटस्थतेमुळे रेड क्रॉस कोणत्याही राजकीय किंवा लष्करी संघर्षात पक्षपाती भूमिका घेत नाही. त्यामुळेच जगभरातील लोकांचा या संस्थेवर विश्वास टिकून आहे.

रेड क्रॉसचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करते. भूकंप, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ यांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसचे स्वयंसेवक तातडीने घटनास्थळी पोहोचतात. तेथे अन्न, पाणी, औषधे, निवारा आणि मानसिक आधार उपलब्ध करून देतात. अनेक वेळा अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणाही अपुऱ्या पडतात, परंतु रेड क्रॉसचे स्वयंसेवक जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू ठेवतात. त्यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात आणि त्यांना नवजीवन मिळते.

आरोग्य क्षेत्रामध्ये रेड क्रॉसचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीमध्ये या संस्थेची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात रक्तदान



शिबिरे आयोजित करून लाखो रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य रेड क्रॉस करत आहे. आजही अपघात, शस्त्रक्रिया किंवा विविध आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तदान हे सर्वांत मोठे दान मानले जाते. रेड क्रॉसने समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण केली आहे. 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश या संस्थेने प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात रेड क्रॉसने दिलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. त्या कठीण काळात लाखो लोकांना अन्न, औषधे, ऑक्सिजन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात रेड क्रॉसने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लोकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण असताना रेड क्रॉसचे स्वयंसेवक धैर्याने काम करत होते. अनेकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवले. महामारीच्या काळात मानवतेचे खरे दर्शन घडवणाऱ्या संस्थांमध्ये रेड क्रॉसचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

भारतात रेड क्रॉस चळवळीची स्थापना १९२० साली झाली. भारतीय रेड क्रॉस सोसायटीने देशभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे आणि आपत्तीग्रस्तांना मदत करणे ही या संस्थेची प्रमुख कामे आहेत. भारतामध्ये पूर, भूकंप, दुष्काळ आणि चक्रीवादळांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसने दिलेली मदत लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

महाराष्ट्रातही रेड क्रॉसचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदतकार्य, आरोग्य शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून ही संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे. ग्रामीण भागात प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होत आहे. आजच्या काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज वाढत आहे आणि रेड क्रॉस या क्षेत्रात प्रभावीपणे कार्यरत आहे.

रेड क्रॉसच्या कार्यामध्ये युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महाविद्यालये आणि शाळांमध्ये युवक रेड क्रॉसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित केली जाते. युवकांनी समाजासाठी काम करावे, रक्तदान करावे, पर्यावरण संवर्धनात सहभागी व्हावे आणि संकटाच्या काळात लोकांना मदत करावी, हा संदेश युवक रेड क्रॉसद्वारे दिला जातो. आजच्या तरुण पिढीमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी ही चळवळ अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यामागे केवळ संस्थेच्या कार्याचा गौरव करणे हा उद्देश नाही, तर समाजामध्ये मानवतेची भावना रुजवणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी मानवी संवेदनशीलता अनेक ठिकाणी कमी होताना दिसते. स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिकवादाच्या या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्था मानवतेचे महत्त्व अधोरेखित करतात.

मानवतेच्या सेवेसाठी आर्थिक संपत्तीपेक्षा संवेदनशील मनाची अधिक गरज असते. एखाद्या संकटग्रस्त व्यक्तीला आधार देणे, भुकेल्याला अन्न देणे, रक्तदान करणे किंवा आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे या छोट्या कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवू शकतात. रेड क्रॉस आपल्याला हेच शिकवते की, मानवतेपेक्षा मोठा धर्म कोणताही नाही.

आज जगभरात युद्ध, दहशतवाद, हवामान बदल आणि महामारी यांसारखी अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. लाखो लोक विस्थापित होत आहेत, अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्थांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. मानवतेच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या या संस्था जगात आशेचा किरण निर्माण करतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने रेड क्रॉसने आपले कार्य अधिक प्रभावी केले आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी आधुनिक साधने, माहिती तंत्रज्ञान आणि संप्रेषण माध्यमांचा वापर करून मदतकार्य अधिक वेगाने केले जात आहे.रेड क्रॉसचे स्वयंसेवक हे या चळवळीचे खरे शिल्पकार आहेत. कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजासाठी काम करणारे हे स्वयंसेवक मानवतेची जिवंत उदाहरणे आहेत. अनेक वेळा स्वतःच्या कुटुंबाची चिंता बाजूला ठेवून ते संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जातात. त्यांच्या सेवेमुळेच लाखो लोकांना नवजीवन मिळते. त्यांच्या कार्यामुळे समाजामध्ये सहकार्य, बंधुभाव आणि एकतेची भावना निर्माण होते.

जागतिक रेड क्रॉस दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. समाजात असलेल्या दुःख आणि वेदना कमी करण्यासाठी प्रत्येकाने काही ना काही योगदान दिले पाहिजे. रक्तदान, अवयवदान, स्वयंसेवा, पर्यावरण संवर्धन किंवा शिक्षणाच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करता येऊ शकते. माणसाने केवळ स्वतःपुरता विचार न करता समाजाच्या कल्याणासाठी पुढे आले पाहिजे. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित आणि सुखी असेल, तरच खऱ्या अर्थाने मानवतेचा विजय होईल.

आज अनेक तरुण सामाजिक कार्याकडे वळताना दिसत आहेत, ही सकारात्मक बाब आहे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनजागृती, निधी संकलन आणि मदतकार्य अधिक प्रभावीपणे केले जात आहे. परंतु केवळ ऑनलाईन सहानुभूती पुरेशी नसून प्रत्यक्ष कृती अधिक महत्त्वाची आहे. रेड क्रॉसची शिकवण आपल्याला कृतीशील मानवता शिकवते. संकटाच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे हीच खरी देशसेवा आणि मानवसेवा आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, जागतिक रेड क्रॉस दिन हा मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. हेन्री ड्युनाँ यांनी सुरू केलेली ही चळवळ आज जगभरातील लाखो लोकांसाठी आशेचा आधार बनली आहे. सेवा, सहानुभूती, बंधुभाव आणि निःस्वार्थ वृत्ती या मूल्यांवर उभी असलेली रेड क्रॉस चळवळ मानवतेचा खरा चेहरा जगासमोर मांडते. आजच्या काळात प्रत्येकाने या चळवळीपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात मानवतेची भावना जोपासली पाहिजे. कारण शेवटी माणसाला माणसाचीच गरज असते, आणि संकटाच्या काळात पुढे येणारा मदतीचा हातच खऱ्या अर्थाने मानवतेचा लाल ध्वज ठरतो.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# पदार्थात फुड कलर घालणं किती सुरक्षित?

हल्लीच्या फुड ट्रेंडमध्ये ''पहिल्यांदा डोळ्यांनी खाणं'' ही संकल्पना खूप महत्त्वाची झाली आहे. केक असो, मिठाई असो किंवा आईस्क्रीम रंगीत आणि आकर्षक दिसणारे पदार्थ लगेच लक्ष वेधून घेतात. पण हेच रंग आपल्या आरोग्यासाठी किती सुरक्षित आहेत, हा प्रश्न अनेकदा दुर्लक्षित राहतो. दिसायला सुंदर असलेलं प्रत्येक पदार्थ शरीरासाठी तितकंच योग्य असेलंच असं नाही.

**फुड कलर म्हणजे काय?**

खाण्याचे रंग (Food Colors) हे विशेषतः अन्नासाठी तयार केलेले रंगद्रव्य असतात. हे नैसर्गिक किंवा कृत्रिम (Artificial) स्वरूपात उपलब्ध असतात. योग्य प्रमाणात आणि प्रमाणित (food-grade) स्वरूपात वापरल्यास ते सुरक्षित मानले जातात.

**फुड कलर वापरणं सुरक्षित आहे का?**

**१) प्रमाणावर अवलंबून सुरक्षितता**

खाण्याचे रंग योग्य प्रमाणात वापरले तर सहसा हानिकारक नसतात. पण जास्त प्रमाणात किंवा वारंवार सेवन केल्यास काहींना ॲलर्जी, पोटदुखी किंवा त्वचेचे त्रास होऊ शकतात.

**२) मुलांसाठी विशेष काळजी**

लहान मुलांच्या शरीरावर कृत्रिम रंगांचा परिणाम लवकर होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या आहारात रंगीत पदार्थांचा अतिरेक टाळणं आवश्यक आहे.

**रंग निवडताना घ्या ही काळजी:**

**३) नेहमी food-grade रंगच वापरा**

बाजारात मिळणारे सर्व रंग खाण्यासाठी योग्य नसतात. त्यामुळे पॅकेजिंगवर 'food-grade' असा स्पष्ट उल्लेख असलेले आणि विश्वासार्ह ब्रँडचेच रंग निवडा.

**४) औद्योगिक रंगांपासून दूर राहा**

कपड्यांचे किंवा इतर औद्योगिक रंग अन्नात वापरणं धोकादायक ठरू शकतं. असे रंग शरीरासाठी अत्यंत घातक असतात.

**रंग वापरण्याची योग्य पद्धत:**

**५) कमी प्रमाणात वापर करा**

फक्त आकर्षक दिसण्यासाठी थोडासा रंग पुरेसा असतो. जास्त रंग घातल्यास पदार्थ कृत्रिम दिसतो आणि चवही बदलू शकते.

**६) पाण्यात मिसळून वापरा**

रंग थेट पदार्थात न घालता आधी पाण्यात मिक्स करून वापरल्यास तो समान पसरतो आणि प्रमाण नियंत्रित राहते.


**७) घरगुती नैसर्गिक रंग वापरा**

शक्य तितकं घरगुती नैसर्गिक पर्यायांचा वापर करा ते अधिक उत्तम ठरेल. उदाहरणार्थ, बीटपासून लाल रंग, हळदीपासून पिवळा, पालकापासून हिरवा आपल्याला अगदी सहज मिळवता येतो. हे रंग सुरक्षित तर आहेतच, पण त्यातून थोडंफार पोषणही मिळतं. विशेषतः मुलांसाठी हा सर्वोत्तम पर्याय आहे.

# लहान मुलांनी झोपेत दात खाणे सवय की आजार?

अनेकदा आपण पाहतो की, लहान मुलं झोपेत किंवा जागेपणीदेखील दात खातात. साधारणपणे ३० टक्क्यांहून अधिक मुलांमध्ये ही समस्या प्रामुख्याने दिसून येते. दात येण्याची प्रक्रिया असो किंवा बदलती लाईफस्टाईल मुलांच्या या सवयीचा त्यांच्या दातांच्या आरोग्यावर आणि झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होत असतो. ही केवळ एक सवय आहे की एखाद्या आजाराचे लक्षण? जाणून घेऊया यामागची नेमकी कारणे.बालरोगतज्ज्ञांच्या मते, रात्री झोपेत लहान मुलं दात खात असतील तर त्या स्थितीत 'ब्रक्सिज्म' असं म्हणतात. ही एक अशी स्थिती आहे ज्यामध्ये मुलं झोपेत नकळत दात खातात. प्रामुख्याने ३ ते ५ वर्षांच्या मुलांमध्ये दिसून येते. परंतू काही किशोरवयीन मुलांमध्ये देखील ही समस्या आढळू शकते.

**यामागील कारणे –**



लहान मुलांमध्ये झोपेत मेंदू आणि स्नायूंमधील समन्वय पूर्णपणे विकसित झालेला नसतो. त्यामुळे झोपेत जबडा घट्ट आवळला जातो आणि मुलं दात खाऊ लागतात.

पोटात जंत झाल्यामुळे होणारा त्रास किंवा गुद्द्वारी खाज यामुळे मुले झोपेत दात खातात.

दुधाचे दात येत असताना किंवा दुधाचे दात पडून कायमचे दात येत असताना मुलांना अस्वस्थता जाणवते. यामुळे मूल झोपेत दात खातात.

वरचे आणि खालचे दात एकमेकांवर नीट बसत नसतील, तरीही मुले झोपेत दात करकरतात.

पोटात गॅस किंवा अपचन झाल्यासही दात खाण्याची समस्या उद्भवू शकते

**मुलांनी दात खाणे नॉर्मल?**

बालरोगतज्ज्ञांच्या मते, मूलांची रात्री झोपेत दात खाण्याची सवय नॉर्मल आहे. पालकांनी घाबरण्याची गरज नाही. मूल जसंजसं मोठं होतं, तसतशी झोप अधिक शांत आणि खोल होते आणि दात खाण्याची समस्या आपोआप दूर होते.

**पालकांसाठी उपाय**

मुलांच्या पोटात जंत आहेत का तपासा. यासाठी डॉक्टरांची मदत घ्या.

झोपण्यापूर्वी मुलांचा स्ट्रेस कमी करा. त्यांना गोष्टी सांगू शकता.

जर झोपेत मुलांच्या दातांचा खूप जास्त आवाज येत असल्यास बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# किडनी हळूहळू खराब होत संपूर्ण शरीर पोखरते; 'ही' लक्षणं दिसताच सावध व्हा, अन्यथा जीवावर बेतेल...

आपल्या शरीरात किडनी हे दोन अतिशय महत्त्वाचे अवयव असतात, जे सतत न थांबता काम करत असतात. त्यांचे मुख्य काम म्हणजे रक्त शुद्ध करणे, शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकणे, पाणी आणि खनिजांचे संतुलन राखणे तसेच रक्तदाब नियंत्रणात ठेवणे. पण समस्या अशी आहे की किडनीचा आजार हळूहळू वाढतो आणि सुरुवातीला त्याची लक्षणे खूप सौम्य असतात किंवा अजिबात समजत नाहीत.

अनेकदा लोक ही लक्षणे सामान्य अशक्तपणा किंवा छोट्या समस्या समजून दुर्लक्ष करतात. जेव्हा आजाराचे निदान होते, तेव्हा किडनी बऱ्याच प्रमाणात खराब झालेली असते. त्यामुळे शरीरात दिसणारी सुरुवातीची लक्षणे वेळेत ओळखणे खूप गरजेचे आहे. चला जाणून घेऊया शरीरात कोणती लक्षणे दिसली तर सावध व्हायला हवे.

**किडनीचा आजार म्हणजे काय?**

क्रॉनिक किडनी डिसीज (CKD) ही अशी अवस्था आहे ज्यामध्ये किडनी हळूहळू आपली काम करण्याची क्षमता गमावू लागते. हा आजार



अचानक होत नाही, तर महिनोन्महिने किंवा वर्षानुवर्षे हळूहळू वाढत जातो. जेव्हा किडनी नीट काम करत नाही, तेव्हा शरीरात घाण आणि विषारी पदार्थ साचू लागतात, त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

**शरीरात कोणती लक्षणे दिसली तर सावध व्हावे?**

**१. सतत थकवा आणि अशक्तपणा**

जर तुम्हाला जास्त काम न करता सतत थकवा जाणवत असेल, तर ते किडनीच्या समस्येचे लक्षण असू शकते. किडनी नीट काम करत नसल्यास शरीरात रक्ताची कमतरता (ॲनिमिया) निर्माण होते. त्यामुळे शरीरात ऑक्सिजन कमी पोहोचतो आणि व्यक्ती सतत थकलेली वाटते.

**२. झोप न लागणे किंवा झोपेची समस्या**

किडनी खराब झाल्यास शरीरात विषारी पदार्थ साचतात, ज्यामुळे झोपेवर परिणाम होतो. अनेक लोकांना रात्री वारंवार जाग येणे किंवा बेचैनी जाणवते.

**३. त्वचा कोरडी आणि खाज येणे**

किडनी शरीरातील घाण नीट बाहेर टाकू शकत नसल्यास रक्तातील खनिजांचे संतुलन बिघडते. त्यामुळे त्वचा कोरडी पडते आणि सतत खाज येते.

**४. वारंवार लघवी येणे किंवा लघवीत बदल**

जर तुम्हाला वारंवार लघवीला जावे लागत असेल, विशेषतः रात्री, तर ते किडनी खराब होण्याचे लक्षण असू शकते. याशिवाय लघवीत फेस येणे, खूप कमी किंवा जास्त लघवी होणे, रंग बदलणे अशी लक्षणे दिसू शकतात.

**५. लघवीत रक्त येणे**

जर लघवीत रक्त दिसत असेल किंवा लघवीचा रंग गुलाबी किंवा तपकिरी झाला असेल, तर हे गंभीर लक्षण असू शकते. हे किडनीच्या फिल्टरिंग सिस्टीममध्ये बिघाड झाल्याचे संकेत असतात.

**६. फेसाळ लघवी (Foamy Urine)**

जर लघवीत खूप फेस दिसत असेल, तर त्याचा अर्थ लघवीत प्रोटीन जात आहे, जे किडनी खराब होण्याचे लक्षण असू शकते.

**७. डोळ्यांच्या आसपास सूज येणे**

किडनी शरीरातील प्रोटीन रोखू शकत नसल्यास प्रोटीन बाहेर पडू लागते, त्यामुळे डोळ्याखाली सूज येते.

**८. पाय आणि घोट्यांमध्ये सूज**

जर पाय, घोटे किंवा शरीराच्या खालच्या भागात सूज राहत असेल, तर त्याचे कारण शरीरात पाणी आणि मीठ साचणे असू शकते, जे किडनीच्या समस्येशी संबंधित असते.

**९. भूक कमी लागणे**

किडनी नीट काम करत नसल्यास शरीरात विषारी पदार्थ वाढतात, त्यामुळे भूक कमी लागते आणि खाण्याची इच्छा होत नाही.

**१०. स्नायूंमध्ये वेदना आणि आकडी**

किडनी शरीरातील कॅल्शियम आणि फॉस्फरसचे संतुलन राखते. हे संतुलन बिघडल्यास स्नायूंमध्ये वेदना आणि आकडी येऊ शकते.

**किडनीला नुकसान पोहोचवणारी कारणे**

दीर्घकाळ रक्तातील साखर जास्त राहिल्यास किडनीतील रक्तवाहिन्यांचे नुकसान होते. तसेच उच्च रक्तदाबामुळे किडनीवर ताण येतो आणि ती हळूहळू कमजोर होते. काही वेदनाशामक औषधांचा जास्त वापर केल्यानेही किडनी खराब होऊ शकते. शरीरात दीर्घकाळ पाण्याची कमतरता राहिल्यास किडनीवर वाईट परिणाम होतो. चुकीचा आहार आणि व्यायामाचा अभाव हे देखील किडनीच्या आजाराचे कारण ठरू शकतात.

**किडनी निरोगी कशी ठेवावी?**

१. साखर आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवा

हे दोन्ही किडनी खराब होण्याची सर्वात मोठी कारणे आहेत.

२. संतुलित आहार घ्या

हिरव्या भाज्या, फळे आणि कमी मीठ असलेले अन्न खा.

३. जास्त पाणी प्या

शरीर हायड्रेट ठेवणे खूप गरजेचे आहे.

४. धूम्रपान आणि मद्यपान टाळा

यामुळे किडनी आणि संपूर्ण शरीराला नुकसान पोहोचते.

५. नियमित तपासणी करा

जर तुम्हाला डायबिटीज, बीपी किंवा कुटुंबात किडनीच्या आजाराचा इतिहास असेल, तर वेळोवेळी किडनीची तपासणी करणे आवश्यक आहे.

शिव निर्णय हे दैनिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, मुद्रक अनिल शंकरराव शिराळकर यांनी महाराष्ट्र इंटरप्राईझेस ब्लॉक नं. ९, बिल्डींग नं. ४, मंत्रीचंडक विहार, हॉटेल बालाजी सरोवर समोर, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर. पिन-४१३००४ , (महाराष्ट्र) येथे छापून घर नं. फ्लॅट नं.२०१, सीएसटी नंबर ८८, अशोक चौक जवळ, नाना पेठ, पुणे-४११००२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले. **संपादक वैष्णवी अनिल शिराळकर** मो ९४२२५५३३३६ ई मेल-E mail - Pune.shiv.nirnay@gmail.com. RNI No.-MAHMAR/2023/87819

OWNED, PRINTED AND PUBLISHED BY ANIL SHANKARRAO SHIRALKAR , Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) PRINTED AT MAHARASHTRA ENTERPRISES Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) Published at Flat No.201, CST NO 88, Near Ashok Chowk, Nana Peth, Pune - 411002 (MAH) EDITOR : VAISHNAVI ANIL SHIRALKAR mobile - 9422553336 E mail - Pune.shiv.nirnay@gmail.com. RNI No.-MAHMAR/2023/87819

# पुणे नगर मार्गावरील वाघोलीत वाहतूक कोंडीचा प्रश्न तीव्र; नागरिक त्रस्त

**शिव निर्णय**/वाघोली (पुणे) : वाघोली व परिसरात दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे हाल होत असून नगर रोडवरील प्रवास नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून प्रवाशांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत आहे.

वाघोली, खराडी, लोणीकंद या मार्गावर आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. मात्र रस्त्यांची अपुरी क्षमता, सिग्नल व्यवस्थेतील त्रुटी आणि वाढती वाहनसंख्या यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. विशेषतः शाळा सुटण्याच्या वेळेत आणि ऑफिसच्या पीक अवर्समध्ये कोंडीचा ताण अधिक जाणवत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, अनेक ठिकाणी अनधिकृत पार्किंग, रस्त्यांवरील अतिक्रमण आणि अपुरी वाहतूक नियोजन यामुळे समस्या अधिक वाढत आहे. याबाबत अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी करण्यात आल्या असल्या तरी ठोस उपाययोजना अद्याप झालेली नाही.

दरम्यान, वाहतूक पोलीसांकडून काही प्रमाणात नियंत्रणाचे प्रयत्न सुरू असले तरी वाढत्या गर्दीसमोर ते अपुरे ठरत आहेत. नागरिकांनी लवकरात लवकर पर्यायी मार्ग, सिग्नल समन्वय आणि रस्ते रुंदीकरणाचे काम हाती घेण्याची मागणी केली आहे.

निष्कर्ष :वाघोलीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न तातडीने सोडवला नाही, तर भविष्यात परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



# पिसेवाडीच्या गणेश वाघ यांचे पहिल्याच प्रयत्नात पीएसआय पदावर दैदिप्यमान यश

**शिव निर्णय**/वेळापूर : जिद्द, चिकाटी, अथक परिश्रम आणि स्वतःच्या कर्तृत्वावर असलेला दृढ विश्वास यांच्या बळावर पिसेवाडी (ता. माळशिरस) येथील सुपुत्र गणेश ज्ञानेश्वर वाघ यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात १२० वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून सेवा बजावत, कुटुंबाची जबाबदारी सांभाळत आणि कोणत्याही प्रकारचे कोचिंग न घेता त्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे पिसेवाडी व वेळापूर परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

गणेश वाघ यांचे माध्यमिक शिक्षण इंग्लिश स्कूल, वेळापूर येथे झाले, तर उच्च शिक्षणासाठी त्यांनी सांगोला येथे जाऊन बी.एस्सी. (केमिस्ट्री) पदवी पूर्ण केली. त्यांचे वडील शेतकरी असून घरची आर्थिक परिस्थिती मध्यम होती. शिक्षणाच्या काळात आर्थिक अडचणींना सामोरे जात असताना त्यांनी हार न मानता सांगोला येथे मामाच्या आश्रयाने शिक्षण सुरू ठेवले. मामाच्या हॉटेलमध्ये काम करत, कष्टाची शिदोरी सोबत घेऊन त्यांनी आपले पदवी शिक्षण पूर्ण केले.

त्यानंतर सांगोला येथील राजमाता अकॅडमीमध्ये दोन वर्षे क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांच्या आयुष्याला वेगळी दिशा मिळाली. मैदानावर पोलीस भरतीसाठी सराव करणाऱ्या युवकांना पाहून त्यांच्या मनातही खाकी वर्दी परिधान करण्याची प्रेरणा जागी झाली. त्या प्रेरणेतून त्यांनी स्वतः सराव सुरू केला आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत देत स्वतःचीही तयारी सुरू ठेवली. अखेर २०१८ मध्ये पहिल्याच प्रयत्नात एसआरपी, सोलापूर येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर निवड होऊन त्यांनी आपल्या स्वप्नाची पहिली पायरी गाठली.

मात्र, गणेश वाघ यांची स्वप्ने इथेच थांबणारी नव्हती. पोलीस दलात सात वर्षे प्रामाणिक सेवा बजावत असताना विवाह, कुटुंब, मुलाचे संगोपन आणि नोकरीच्या जबाबदाऱ्या सांभाळतानाही त्यांच्या मनातील 'पोलीस उपनिरीक्षक' होण्याची जिद्द कायम धगधगत राहिली. आई-वडिलांची व पत्नीची भक्कम साथ, स्वतःची अभ्यासू वृत्ती आणि कठोर मेहनतीच्या जोरावर त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. २०२३ मध्ये पूर्व परीक्षा, २०२४ मध्ये मुख्य परीक्षा आणि २०२६ मध्ये मैदानी चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण करत अखेर ३० एप्रिल २०२६ रोजी घोषित झालेल्या निकालात पीएसआय पदावर यशाची मोहोर उमटवली.

परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, मनात जिद्द आणि कृतीत सातत्य असेल तर यशाचा मार्ग नक्की खुला होतो, हे गणेश वाघ यांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिले आहे.

त्यांच्या या प्रेरणादायी यशाने



ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या असंख्य युवकांसमोर एक आदर्श निर्माण केला असून, पिसेवाडी आणि वेळापूर परिसरासाठी त्यांचे हे यश निश्चितच अभिमानास्पद ठरले आहे.

# ऐन उन्हाळ्यात वीज पुरवठ्याबाबत अडथळा; कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधींकडून दखल

**शिव निर्णय**/पंढरपूर : पंढरपूर व मंगळवेढा विभागात वीज पुरवठ्याबाबत येणाऱ्या अडचणीबाबत गुरुवारी मंगळवेढा येथे आ. समाधान आवताडे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन उन्हाळ्यात विजपुरवठा अधिक सुरळीत राहावा यासाठी सतर्क राहावे. याचबरोबर जळालेला ट्रांसफार्मर तीन दिवसाच्या आत मध्ये द्या, पण शेतीपंपाची विज पूर्ण दाबाने आठ तास द्या आणि सिंगल फेज वीज पूर्ण दाबाने द्या अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. याचबरोबर महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांना शेतकऱ्यांशी नम्रतेने बोलण्याबाबतच्या सूचना दिल्या. शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी पुरेशा प्रमाणात वीजपुरवठा व्हावा. यासाठी विशेष नियोजन करण्याचे निर्देश आमदार समाधान आवताडे यांनी दिले.याप्रसंगी त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कार्तिकेएन यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून वीजपुरवठ्याबाबत येणाऱ्या अडचणी निदर्शनास आणून दिल्या.

वाढत्या उन्हाळ्यामुळे वीजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून, त्याचा परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होताना दिसत आहे. शहरासह ग्रामीण भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे तसेच वीज जळण्याच्या घटनांत वाढ झाल्याने शेतकरी आणि नागरिक त्रस्त झाले आहेत. गेल्या काही दिवसांत अनेक भागांतील वीज ट्रांसफार्मर जळाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे काही ठिकाणी तासन्तास वीजपुरवठा बंद राहिला. जळालेले अनेक ट्रांसफार्मर दुरुस्तीसाठी पडून असल्याने वीजपुरवठा सुरळीत करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. पंढरपूर मंगळवेढा तालुक्यामध्ये जवळपास ४५ ट्रांसफार्मर दुरुस्तीसाठी ऑइल नसल्यामुळे थांबलेले होते, त्यावेळी आमदार अधीक्षक अभियंता यांना भ्रमणध्वनी द्वारे कळवून २००० लिटरची व्यवस्था करण्यास सांगितले त्यामुळे पेंडिंग असलेले ४५ ट्रांसफार्मर लवकरात लवकर देण्यास सांगितले तसेच वाढलेल्या भारामुळे ट्रान्सफॉर्मर आणि वीजवाहिन्यांवर ताण येत आहे. दरम्यान, भीमा नदीत पाणी सोडण्यात आलेले असून जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार औज आणि हीळ्ळी बंधाऱ्यापर्यंत पोहचे पर्यंत वीज पुरवठा तीन तास करण्यात आला होता आता त्याठिकाणी पाणी पोहचले असून वीजपुरवठा सुरळीत करणे संदर्भात पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कार्तिकेयन साहेब यांना भ्रमणध्वनीद्वारे शेतकऱ्यांच्या अडचणी सांगून वीज पुरवठा पूर्वत करण्यात यावा असे सांगण्यात आला. दोन्ही तालुक्यात कमी दाबाने वीज मिळत असल्याने नागरिकांना उकाड्यात मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पाण्याच्या मोटारी, शेतीपंप आणि घरगुती उपकरणे व्यवस्थित सुरू राहत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.



या पार्श्वभूमीवर पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर आणि मंगळवेढा विभागातील महावितरण अधिकाऱ्यांची बैठक घेऊन वीज पुरवठा पूर्ववत ठेवण्याच्या सूचना दिल्या.बैठकीदरम्यान आमदार समाधान आवताडे यांनी वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना जळालेले डेपो त्वरित दुरुस्त करावेत, अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून द्यावेत तसेच कमी दाबाची समस्या दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात अशा सूचना केल्या.

तसेच कार्यकारी अभियंता शिंदे सर्व अधिकारी यांना आमदार समाधान आवताडे यांनी महावितरणचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना नागरिक व शेतकरी यांच्याशी नम्रतेने बोलण्यात व वागण्यात यावे अशा सूचना दिल्या. यावेळी कार्यकारी अभियंता शिंदे सहाय्यक कार्यकारी अभियंता देवकर उपकार्यकारी अभियंता मरळी उपकार्यकारी अभियंता अकोलकर. मंगळवेढा पंचायत समितीचे सभापती सौ दिपाली ताड पंढरपूर पंचायत समितीचे सभापती शुभम आगवणे जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर जिल्हा परिषद सदस्य रमेश भांजे जिल्हा परिषद सदस्य जनार्दन शिवशरण उपसभापती अर्जुन मल्लाळे पंचायत समिती सदस्य विनायक यादव विजय माने श्रीमंत म्हेत्रे सचिन चव्हाण दत्ता यादव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचे शिक्षण होणार गतीमान

**शिव निर्णय**/मुंबई : आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या पाच प्राथमिक आश्रमशाळांची माध्यमिक स्तरापर्यंत आणि १९ माध्यमिक शाळांची उच्च माध्यमिक - कनिष्ठ महाविद्यालय स्तरापर्यंत श्रेणीवाढ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

यामुळे डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचे शिक्षण गतीमान होणार आहे.(चरहरअॅरीहींअॅर उरलळ-पर्शीं ृशलळीळेप)

या निर्णयामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस मोठा हातभार लागणार आहे. या आश्रमशाळांची श्रेणीवाढ केल्याने आवश्यक अशा पदनिर्मितीस आणि त्याकरिता खर्चाच्या तरतूदीस मंजुरी देण्यात आली. राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी सन १९७२-७३ पासून 'आश्रमशाळा समूह' योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत सध्या स्वयंसेवी संस्थाकडून ५५६ अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जातात. या शाळांमध्ये सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या आश्रमशाळा दुर्गम, अतिदुर्गम, डोंगराळ किंवा नक्षलग्रस्त अशा भागात आहेत. घरच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे आदिवासी विद्यार्थी तालुका किंवा जिल्हयाच्या ठिकाणी जाऊन पुढील शिक्षण घेण्यास उत्सुक नसल्यामुळे गळतीच्या प्रमाणात वाढ होऊन विद्यार्थी माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहतात. या विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच निवासी शिक्षण उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे.

त्यानुसार राज्यातील ५ प्राथमिक आश्रमशाळांची श्रेणीवाढ करुन तिथे ८ वी ते दहावीचे वर्ग सुरु करण्यास तसेच माध्यमिक अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये १८ ठिकाणी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व एका ठिकाणी केवळ ११ वी व १२ वी कला अशा १९ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या माध्यमिक आश्रमशाळांमध्ये श्रेणीवाढ केल्याने आवश्यक शिक्षकांची ३० नियमित पदे व २५ बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांची २५ पदे यांच्या पदनिर्मितीस तसेच १९ कनिष्ठ महाविद्यालयांसाठी आवश्यक १४८ शिक्षकांच्या नियमित पदनिर्मितीस आणि या सर्व पदांच्या आवश्यक खर्चाच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.

**सोलापुरला नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय**

सोलापूरला नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्लाय सुरु करण्यास आणि त्यासाठी सोलापुरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून पदवीस्तरावरचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनचे नाव यापुढे शासकीय अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था (गव्हर्मेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँण्ड टेक्नॉलॉजी), सोलापूर असे करण्यास देखील मंत्रिमंडळाने मान्यता दिली

**श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित**

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथे तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. आता हे महाविद्यालय तुळजाभवानी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर, या नावाने ओळखले जाईल. या निर्णयामुळे महाविद्यालयाचे सक्षमीकरण होऊन अद्ययावत शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध होण्याने या परिसरातील होतकरूंना दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षण मिळणे सुलभ होणार आहे.

# स्वेरी फार्मसी आणि आयसीटी, मुंबई यांच्यात सामंजस्य करार

पंढरपूर- शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात जागतिक स्तरावर नाव असलेल्या मुंबई येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी' (आयसीटी) आणि गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार (एमओयु) संपन्न झाला. या सामंजस्य करारामुळे ग्रामीण भागातील औषधनिर्माणशास्त्राच्या विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना नविन संशोधनास वाव मिळणार आहे.

या सामंजस्य कराराचा मुख्य उद्देश हा संशोधन आणि विद्यार्थी विकासावर भर देणे हा असून औषधनिर्माणशास्त्रातील नाविन्यपूर्ण संशोधन, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि प्राध्यापकांसाठी उच्चस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे हा आहे. या संयुक्त भागीदारीमुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक एकत्र येऊन नवीन औषध प्रणाली आणि आरोग्य क्षेत्रातील विविध आव्हानांवर काम करू शकणार आहेत. मान्यवरांच्या उपस्थितीत या महत्वपूर्ण कराराच्या कागदपत्रावर आयसीटी मुंबईचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित आणि स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डॉ. पी. के. खुळे आणि डॉ. व्ही. व्ही. मोरे यांनी स्वाक्षरी केल्या. या करारामुळे आयसीटीमधील प्रगत प्रयोगशाळा आणि तंत्रज्ञान स्वेरीच्या विद्यार्थ्यांसाठी खुले होईल.' कराराचे मुख्य फायदे म्हणजे संशोधन उपक्रमात औषधनिर्माण क्षेत्रातील प्रगत संशोधनासाठी दोन्ही संस्था संयुक्तपणे काम करतील. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, गेस्ट लेक्चर्स आणि प्रयोगशाळेतील प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेता येईल. या करारानुसार प्राध्यापकांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित केल्या जातील, ज्यामुळे अध्यापन आणि संशोधन पद्धतींमध्ये अधिक सुधारणा होईल. स्वेरीचे सचिव डॉ. सूरज रोंगे यांनी या कराराबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, 'आयसीटी सारख्या नामांकित संस्थेशी जोडले जाणे ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. याचा सर्वाधिक फायदा आमच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये आणि उच्च शिक्षणात होईल.' या करारामुळे पंढरपूरसारख्या ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत होणार असून, औषधनिर्माण क्षेत्रातील संशोधनाला नवीन दिशा मिळणार आहे. या सामंजस्य कराराचे हस्तांतरण आयसीटी मुंबईचे प्राध्यापक डॉ. श्रीरंग जोशी यांनी केले असून, यावेळी प्रा. डॉ. शिरीषकुमार आंबवडे हे उपस्थित होते. या यशस्वी कराराबद्धल संस्थेचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी या सामंजस्य कराराचे स्वागत केले आहे.

# महाराणा प्रताप ना कभी हारे ; ना अकबर कभी जीता !

**शिव निर्णय**/ रमेश कृष्णराव लांजेवार मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर. :

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहानभूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.

महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल. हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल. असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते. ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.

ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले. तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला. त्याचा पाय निकामी झाला. अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला.

आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला. आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!

# राष्ट्रगीतांचे जनक ; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

**शिव निर्णय/श्याम ठाणेदार/दौंड/९९२२५४६२९५ :** भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने ''सर'' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

शिव निर्णय हे दैनिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, मुद्रक अनिल शंकरराव शिराळकर यांनी महाराष्ट्र इंटरप्राईझेस ब्लॉक नं. ९, बिल्डींग नं. ४, मंत्रीचंडक विहार, हॉटेल बालाजी सरोवर समोर, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर. पिन-४१३००४ , (महाराष्ट्र) येथे छापून ब्लॉक नं. ९, बिल्डींग नं. ४, मंत्रीचंडक विहार, हॉटेल बालाजी सरोवर समोर, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर. पिन-४१३००४ (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले. **संपादक अनिल शंकरराव शिराळकर** मो ९९२३४५६७९६ RNI No.-MAHMAR/2020/79125

**OWNED, PRINTED AND PUBLISHED BY ANIL SHANKARRAO SHIRALKAR , Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) PRINTED AT MAHARASHTRA ENTERPRISES Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) Published at Block No.9, Bldg.No.4, Mantri Chandak vihar, Opp. Hotel Balaji Sarovar, Hotgi Road, Solapur, Dist. Solapur (MAH) EDITOR : ANIL SHANKARRAO SHIRALKAR** MO-9923456796, RNI No.-MAHMAR/2020/79125

# निर्मल बालक प्रश्नपेढी (प्रश्नातून शिकूया सरावातून जिंकूया)

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर. संकलन : सौ.पूनम हनुमंत चव्हाण पद - सहशिक्षिका शिक्षण/संपर्क: . ९७३०८४२१२१

विषय : डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य
दिनांक : ०४/०४/२६ ते १०/०५/२६

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म कधी झाला?
अ) १४ एप्रिल १८९१
इ) १५ ऑगस्ट १८९०
उ) २ ऑक्टोबर १८९२
ई) २६ जानेवारी १८९१

२. त्यांचा जन्म कुठे झाला?
अ) मुंबई
इ) महू
उ) पुणे
ई) नागपूर

३. त्यांचे पूर्ण नाव काय होते?
अ) भीमराव रामजी आंबेडकर
इ) भीमराव शंकर आंबेडकर
उ) रामजी भीमराव आंबेडकर
ई) भीमराव गणेश आंबेडकर

४. त्यांना कोणत्या नावाने ओळखले जाते?
अ) लोकमान्य
इ) बाबासाहेब
उ) महात्मा
ई) सरदार

५. डॉ.आंबेडकर कोणत्या क्षेत्रात प्रसिद्ध होते?
अ) कायदा
इ) समाजसुधारणा
उ) अर्थशास्त्र
ई) सर्व

६. ते भारतीय राज्यघटनेचे काय होते?
अ) अध्यक्ष
इ) शिल्पकार
उ) न्यायाधीश
ई) मंत्री

७. त्यांनी कोणत्या देशात शिक्षण घेतले?
अ) भारत
इ) इंग्लंड
उ) अमेरिका
ई) इ आणि उ

८. त्यांनी कोणत्या विद्यापीठातून PHD केली?
अ) हार्वर्ड
इ) कोलंबिया
उ) ऑक्सफर्ड
ई) मुंबई

९. त्यांनी कोणत्या चळवळीचे नेतृत्व केले?
अ) स्वातंत्र्य
इ) अस्पृश्यता विरोध
उ) औद्योगिक
ई) कृषी

१०. त्यांनी कोणत्या समाजासाठी काम केले?
अ) श्रीमंत
इ) मागासवर्ग
उ) व्यापारी
ई) अधिकारी

११. त्यांनी कोणत्या प्रथेविरुद्ध लढा दिला?
अ) सतीप्रथा
इ) अस्पृश्यता
उ) बालविवाह
ई) हुंडा

१२. त्यांनी कोणत्या धर्माचा स्वीकार केला?
अ) हिंदू
इ) इस्लाम
उ) बौद्ध
ई) ख्रिश्चन

१३. धर्मांतर कधी केले?
अ) १९५०
इ) १९५६
उ) १९४७
ई) १९६०

१४. त्यांनी कोणत्या ग्रंथाची निर्मिती केली?
अ) संविधान
इ) गीता
उ) वेद
ई) रामायण

१५. त्यांनी कोणत्या चळवळीचे नेतृत्व केले?
अ) चवदार तळे सत्याग्रह
इ) दांडी मार्च
उ) भारत छोडो
ई) स्वदेशी

१६. ते कोणत्या पदावर होते?
अ) पंतप्रधान
इ) कायदा मंत्री
उ) राष्ट्रपती
ई) मुख्यमंत्री

१७. त्यांनी कोणत्या क्षेत्रात शिक्षण घेतले?
अ) कायदा
इ) अर्थशास्त्र
उ) राजकारण
ई) सर्व

१८. त्यांनी कोणत्या गोष्टीवर भर दिला?
अ) समानता
इ) शिक्षण
उ) बंधुता
ई) सर्व

१९. त्यांनी कोणत्या वृत्तपत्राची सुरुवात केली?
अ) मूकनायक
इ) केसरी
उ) मराठा
ई) लोकमत

२०. त्यांनी कोणत्या संस्थेची स्थापना केली?
अ) बहिष्कृत हितकारिणी सभा
इ) काँग्रेस
उ) भाजपा
ई) राष्ट्र सेवा दल

२१. त्यांनी कोणत्या कायद्याशी संबंधित काम केले?
अ) हिंदू कोड बिल
इ) जमीन कायदा
उ) कर कायदा
ई) औद्योगिक कायदा

२२. त्यांनी कोणत्या गोष्टीस प्रोत्साहन दिले?
अ) शिक्षण
इ) समानता
उ) हक्क
ई) सर्व

२३. त्यांचे निधन कधी झाले?
अ) १९५५
इ) १९५६
उ) १९५७
ई) १९६०

२४. त्यांचे कार्य कोणत्या क्षेत्रात प्रसिद्ध आहे?
अ) सामाजिक
इ) शैक्षणिक
उ) राजकीय
ई) सर्व

२५. त्यांनी कोणत्या वर्गासाठी काम केले?
अ) गरीब
इ) मागासवर्ग
उ) सर्व
ई) श्रीमंत

२६. त्यांनी कोणत्या चळवळीचे नेतृत्व केले?
अ) मंदिर प्रवेश
इ) स्वातंत्र्य
उ) औद्योगिक
ई) कृषी

२७. त्यांनी कोणत्या गोष्टीस विरोध केला?
अ) भेदभाव
इ) समानता
उ) शिक्षण
ई) विकास

२८. त्यांनी कोणत्या प्रकारचे समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला?
अ) समान
इ) विषम
उ) वर्गीय
ई) भेदभाव

२९. ते कोणत्या प्रकारचे नेते होते?
अ) लोकहितवादी
इ) स्वार्थी
उ) कठोर
ई) धार्मिक

३०. त्यांनी कोणत्या गोष्टीस प्राधान्य दिले?
अ) शिक्षण
इ) समानता
उ) न्याय
ई) सर्व

३१. त्यांनी कोणत्या प्रकारच्या लोकांना मदत केली?
अ) गरीब
इ) मागासवर्ग
उ) सर्व
ई) श्रीमंत

३२. त्यांनी कोणत्या गोष्टीवर भर दिला?
अ) शिक्षण
इ) समानता
उ) स्वातंत्र्य
ई) सर्व

३३. त्यांनी कोणत्या गोष्टीस विरोध केला?
अ) अस्पृश्यता
इ) समानता
उ) शिक्षण
ई) विकास

३४. त्यांनी कोणत्या प्रकारचे नेतृत्व केले?
अ) लोकहितवादी
इ) स्वार्थी
उ) कठोर
ई) धार्मिक

३५. त्यांनी कोणत्या गोष्टीस प्रोत्साहन दिले?
अ) शिक्षण
इ) समानता
उ) हक्क
ई) सर्व

३६. त्यांनी कोणत्या प्रकारचे निर्णय घेतले?
अ) ऐतिहासिक
इ) सामान्य
उ) धार्मिक
ई) वैयक्तिक

३७. त्यांनी कोणत्या क्षेत्रात काम केले?
अ) शिक्षण
इ) समाज
उ) कायदा
ई) सर्व

३८. त्यांनी कोणत्या प्रकारच्या लोकांसाठी काम केले?
अ) गरीब
इ) मागासवर्ग
उ) सर्व
ई) व्यापारी

३९. त्यांनी कोणत्या गोष्टीस प्रोत्साहन दिले?
अ) शिक्षण
इ) समानता
उ) बंधुता
ई) सर्व

४०. त्यांनी कोणत्या प्रकारचे समाज निर्माण केले?
अ) समान
इ) विषम
उ) वर्गीय
ई) भेदभाव

४१. त्यांनी कोणत्या प्रकारचे कार्य केले?
अ) सामाजिक
इ) राजकीय
उ) शैक्षणिक
ई) सर्व

४२. त्यांनी कोणत्या गोष्टीवर भर दिला?
अ) न्याय
इ) समानता
उ) स्वातंत्र्य
ई) सर्व

४३. त्यांनी कोणत्या गोष्टीस विरोध केला?
अ) भेदभाव
इ) समानता
उ) शिक्षण
ई) विकास

४४. त्यांनी कोणत्या प्रकारचे नेतृत्व केले?
अ) लोकहितवादी
इ) स्वार्थी
उ) कठोर
ई) धार्मिक

४५. त्यांनी कोणत्या प्रकारच्या लोकांना मदत केली?
अ) गरीब
इ) मागासवर्ग
उ) सर्व
ई) श्रीमंत

४६. त्यांनी कोणत्या गोष्टीस प्रोत्साहन दिले?
अ) शिक्षण
इ) समानता
उ) न्याय
ई) सर्व

४७. त्यांनी कोणत्या प्रकारचे समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला?
अ) समान
इ) विषम
उ) वर्गीय
ई) भेदभाव

४८. ते कोणत्या प्रकारचे नेते होते?
अ) लोकहितवादी
इ) स्वार्थी
उ) कठोर
ई) धार्मिक

४९. त्यांनी कोणत्या गोष्टीस प्राधान्य दिले?
अ) शिक्षण
इ) समानता
उ) न्याय
ई) सर्व

५०. त्यांचे कार्य कोणत्या क्षेत्रात प्रसिद्ध आहे?
अ) सामाजिक
इ) शैक्षणिक
उ) राजकीय
ई) सर्व

उत्तर सूची

१-अ । २-इ । ३-अ । ४-इ । ५-ई । ६-इ । ७-ई । ८-इ । ९-इ । १०-इ ।११-इ । १२-उ । १३-इ । १४-अ । १५-अ । १६-इ । १७-ई । १८-ई । १९-अ । २०-अ ।२१-अ । २२-ई । २३-इ । २४-ई । २५-उ । २६-अ । २७-अ । २८-अ । २९-अ । ३०-ई ।३१-उ । ३२-ई । ३३-अ । ३४-अ । ३५-ई । ३६-अ । ३७-ई । ३८-उ । ३९-ई । ४०-अ । ४१-ई । ४२-ई । ४३-अ । ४४-अ । ४५-उ । ४६-ई । ४७-अ । ४८-अ । ४९-ई । ५०-ई ।

: वाचकांना एक विनंती आहे की यासंदर्भात कोणतीही अडचण असल्यास किंवा आपली प्रतिक्रिया द्यायची असेल तर मो.नो. ९७३०८४२१२१ आपली प्रतिक्रिया कळवाटिप : आठवडयाच्या प्रत्येक गुरूवारी प्रश्नसंच प्रकाशित करित आहोत.वरिल प्रश्नसंचचे उत्तर याच अंकात प्रकाशित केले आहे. आपणास या प्रश्न संच अथवा स्पर्धा परिक्षा सुचि बाबत सुचना असतील तर वरिल संपर्क क्रमांकावर कळवाव्यात.